बुधवार, 17 ऑगस्ट 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 22
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 17 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 ● ISSUE-22 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

# सत्ता लगेच डोक्यात गेली का ?

## शिंदे गटातील आमदाराला अजित पवारांनी सुनावले खडेबोल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : शिंदे गटातील एक आमदार महाराष्ट्रात संघर्ष पेटावा अशी भाषा करत आहेत. शिवसैनिकांना ठोकून काढा... हात तोडा... हात तोडता आले नाही तर तंगडी तोडा... आरे ला कारे म्हणा... कोण अंगावर आलं तर कोथळा काढा अरे ही काय पध्दत आहे का? कुठे शाहू - फुले - आंबेडकरांचा महाराष्ट्र... आपले पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सुसंस्कृतपणा शिकवला... ज्यांनी नेहमी काम करत असताना कसे राजकारण केले पाहिजे हे या राज्याला संस्कार दिले त्या महाराष्ट्रात तोडा - फोडा - मारा ही भाषा केली जाते हे एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस, भाजपला पटते का? असा संतप्त सवाल करतानाच दुसरीकडे शिंदे गटातील एका आमदाराने सरकारच्याच कर्मचाऱ्याला मारले आहे. तुम्ही कायदा हातात घ्यायला लागला आहात. तुम्ही स्वतः ला कोण समजता... सत्ता आली म्हणजे मस्ती आली का तुम्हाला? कुणीही व्यक्ती असली तरी त्यांना संविधान, कायदा, नियम सारखे असतात. कायद्यापेक्षा कुणीही मोठा नाही. तो सरकारमध्ये असुद्या नाहीतर विरोधात यापध्दतीची भाषा... अजून तर कुठं सरकार नीट अस्तित्वात आले नाही तोपर्यंत सरकारमधील आमदारांना इतकी मस्ती आलीय का? असा थेट हल्लाबोल राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सरकारवर पत्रकार परिषदेत आज केला.**

असे वर्तन करणाऱ्यांना समजावून सांगण्याची जबाबदारी संबंधितांची नाही का? हे सगळे उघड्या डोळ्यांनी महाराष्ट्र बघतो. आपण अमृत महोत्सव साजरा करत असताना आणि ते पण आनंदाने १५ ऑगस्ट साजरा करत असताना देशाच्या आर्थिक राजधानीत अशी भाषा वापरली जाते. इथे तुम्ही अशी भाषा वापरत असाल तर त्या चांद्यापासून बांद्यापर्यंत शेवटच्या माणसाची काय अवस्था होणार आहे या गोष्टीही लक्षात घ्या असेही अजित पवार यांनी शिंदे - फडणवीस यांना सुनावले.



ज्याने कर्मचाऱ्याला मारले त्याच्यावर गुन्हा दाखल झाला तरी मी असाच वागणार इथपर्यंतची मस्ती काही आमदारांची झाली आहे. काहींवर गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न झाला आहे परंतु माणसाचे कधी - कधी चुकल्यानंतर माणूस चूक कबूल करतो परंतु ते राहिलं बाजूला... सत्ता लगेच डोक्यात गेली का? असा संतप्त सवाल करतानाच जेवढी जबाबदारी विरोधी पक्षांची तेवढीच जबाबदारी मिडियाची आहे त्यांनी अशा गोष्टीमध्ये पुन्हा कायदा हातात घेण्याचे धाडस होणार नाही अशी लेखणी चालवली पाहिजे असा सल्लाही दिला. अशा पध्दतीने वागणाऱ्या आमदारांवर तातडीने कारवाई झाली पाहिजे आणि ती लोकांना दिसली पाहिजे नुसते मिलीभगत होता कामा नये. नाहीतर तू मारल्यासारखे कर मी रडल्यासारखे करतो असे नको. नुसते कागदोपत्री अटक केल्यासारखे दाखवायचे आणि हात मिळवायचे आणि बोलायचे अटक केली होती आणि त्यांना जामीन मंजूर करायचा असली नौटंकी अजिबात चालणार नाही असा स्पष्ट इशाराही अजित पवार यांनी दिला.

आज पत्रकार परिषदेत अजित पवार यांनी सरकारला धारेवर धरत उद्या होणाऱ्या अधिवेशनाला विरोधीपक्ष सरकारशी कशापद्धतीने लढा देणार याची भूमिका स्पष्ट केली. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारच्या चहापान कार्यक्रमावर विरोधी पक्षाने बहिष्कार टाकला असून याबाबत मुख्यमंत्र्यांना पत्र दिले आहे असे पत्रकार परिषदेच्या सुरुवातीलाच अजित पवार यांनी सांगितले.

### अधिवेशनात कोण कोणावर बरसणार?

पावसाळी अधिवेशन आजपासून सुरु होत आहे. या अधिवेशनात विरोधी पक्ष आणि सत्ताधाऱ्यांमध्ये चांगलीच जुंपणार हे काही वेगळे सांगायला नको. कोण कोणाच्या निशाण्यावर असेल हे पाहणे औत्सुक्याचे असेल. या वेळच्या अधिवेशनात शिंदे- फडणवीस विरुद्ध ठाकरे गट, राष्ट्रवादी आणि काँग्रेस असेच काहीसे वर्णन यंदाच्या पावसाळी अधिवेशनाचे करावे लागेल. कारण सेनेत बंडखोरी झाली आणि सत्तांतरही झाले. मागच्या अधिवेशनात सत्तेत असलेली महाविकास आघाडी आता विरोधी बाकावर दिसणार आहे. नुकतेच खाते वाटप झालेले आहे. त्यामुळे विरोधक सत्ताधाऱ्यांवर तुटून पडणार आहे. पण सत्ताधारीसुद्धा चांगलेच तेल लावलेले पैलवान आहेत. त्यामुळे यंदाचे पावसाळी अधिवेशन चांगलेच गाजण्याची शक्यता आहे.



# जम्मू-काश्मीरमध्ये बस दरीत कोसळली, ६ जवान शहीद

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमध्ये चंदनवाडीत आयटीबीपीच्या जवानांची बस दरीत कोसळून भीषण अपघात झाला आहे. या बसमध्ये एकूण ३९ जवान प्रवास करत होते. या अपघातात आयटीबीपीचे ६ जवान शहीद झाल्याची माहिती समोर आली आहे. अपघातात ३२ जवान जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने रूग्णालयात हलवण्यात आले आहे. अपघात एवढा भीषण होता की यात ६ आयटीबीपीच्या जवानांचा मृत्यू झाला आहे.

३९ जवानांपैकी ३७ आयटीबीपीचे तर २ जम्मू-काश्मीर पोलिसांचे असल्याचे सांगण्यात येत आहे. ज्या बसमध्ये जवान प्रवास करत होते ती सिव्हिल बस होती आणि अचानक ब्रेक निकामी झाल्याने बस रस्त्याच्या कडेला असलेल्या दरीत कोसळली. हे जवान चंदनवाडीहून पहलगामच्या दिशेने जात होते. पहलगामच्या फ्रिसलानमध्ये ही बस नदीत पडली आहे. अमरनाथ यात्रेसाठी या भागाच्या सुरक्षेसाठी जवान तैनात करण्यात आले होते. या अपघातात अनेक जण जखमी झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेसाठी चंदनवाडीहून ही बस पहलगामच्या दिशेने येत होती. अपघात एवढा मोठा होता की बस चंदनवाडी येथे सुमारे २०० फूट खाली दरीत कोसळसली.

# तब्बल १,०२६ कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**भरुच :** मुंबई पोलीस अँटी नार्कोटिक्स सेलच्या वरळी युनिटने थेट गुजरातमध्ये जाऊन ड्रग्ज माफियांविरोधात धडक कारवाई केली आहे. गुजरातच्या भरुच जिल्ह्यातील अंकलेश्वर परिसरातील एका ड्रग्ज फॅक्ट्रीचा भांडाफोड पोलिसांनी केला आहे. यासोबतच जवळपास ५१३ किलो एमडी ड्रग्ज जप्त केले आहेत. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत तब्बल १,०२६ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. छापा टाकण्यात आलेल्या ड्रग्ज फॅक्ट्रीमधून सात जणांना अटक देखील केली गेली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये एका महिलेचा देखील समावेश आहे. राज्यात ड्रग्ज आणि कोकिन माफिया गँग विरोधात मुंबई पोलिसांनी मोठी आघाडी उघडली आहे. गेल्या काही दिवसांत मुंबई पोलिसांनी ड्रग्ज माफियांविरोधात आक्रमक भूमिका घेत कारवाई केली आहे. मुंबई पोलिसांच्या नार्कोटिक्स विभागाने याच महिन्याच्या



सुरुवातीला नालासोपारा शहरातून १,४०० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले होते. इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्ज आढळून आल्यानंतर नालासोपारा शहरात खळबळ माजली होती. नालासोपारामध्ये याआधी अनेकदा अंमली पदार्थांविरोधात कारवाई झाली आहे. पण पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्ज जप्त करण्यात पोलिसांना यश आले होते. तसेच २६ मे रोजी गुजरातमधील बंदरावरुन पोलिसांनी २६ किलो कोकेन जप्त केले होते. याची किंमत जवळपास ५०० कोटी रुपयांच्या घरात होती. आरोपी ड्रग्जला चक्क मीठ असल्याचे सांगून इराणला घेऊन जात होते. गुप्तचर विभाग आणि पोलिसांच्या नार्कोटिक्स विभागाची ड्रग्ज माफियांवर नजर आहे.

# गोंदिया जिल्ह्यातील वैनगंगा नदीला पूर

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसाने मध्य प्रदेशसह गोंदिया जिल्ह्यातील धरणाचे दरवाजे उघडल्याने वैनगंगेला पूर आला आहे. या पुरात जनजीवन अस्ताव्यस्त झाले असून, २०० हून अधिक कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. महत्वाचे म्हणजे जिल्ह्यातील एका राज्य मार्गासह ८१ रस्त्यांवरील वाहतूक पुरामुळे बंद पडली आहे.

पुराचा सर्वाधिक फटका भंडारा शहराला बसला असून, शहरातील ग्रामसेवक कॉलनी, नागपूर नाका परिसर, भोजापूर, गणेशपूर या परिसरात मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी शिरले आहे. सोमवारी सायंकाळपर्यंत १७५ कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले होते, तर मंगळवार दुपारपर्यंत हा आकडा २१०च्या वर पोहोचला. शोध व बचाव कार्यासाठी एसडीआरएफचे पथकही शहरात दाखल झाले असून, त्यांनी कार्याला प्रारंभ केला आहे.



पूरबाधितांना राहण्यासाठी व जेवणाची सोय करण्यात आली आहे. हवामान खात्यामार्फत पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला नसला तरी वैनगंगेच्या कोपामुळे जनजीवन प्रभावित झाले असून, शेतशिवारात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने धान पीक सडण्याच्या मार्गावर आहे. मोहाडी शहरासह तालुक्यात वैनगंगा व सूर नदीचे पाणी गावांत शिरले.

# अबबsss पृथ्वीवरचे आश्चर्य, ढगातून ढगात उलटा पाऊस!

## पृथ्वीवरीलच नव्हे तर आपल्या आकाशगंगेतील व सूर्यमालेतील दुर्मिळातील दुर्मिळ नोंदली गेलेली नैसर्गिक घटना

आधुनिक केसरी न्यूज

किरणकुमार आवारे

शिरवाडे वाकद : पृथ्वीवर पहिल्यांदाच घडलेली घटना अशी ऐतिहासिक नोंद करता येईल असे महराष्ट्रात घडले आहे. जगातले अनोखे आश्चर्य म्हणजे ढगातून ढगात उलट्या पावसाची नोंद झाली आहे. आंतरराष्ट्रीय ढगफुटी तज्ज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ प्रा. किरणकुमार जोहरे यांनी या घटनेचा शोध घेत आपले संशोधन निष्कर्षांसह उलगडले. याबाबतचे संशोधन निष्कर्ष ते आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर देखील मांडणार असून याबाबतचा रिसर्च पेपर ते प्रख्यात वैज्ञानिक नियतकालिकाला देखील प्रकाशनासाठी पाठविणार आहेत.

नंदुरबारचा ढगातून ढगातील उलटा पाऊस व तापमानात मोठा फरकामुळे युरोप, ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड आदी ठिकाणी होणारा वॉटरस्पउट म्हणजे उलटा पाऊस हा वेगळा प्रकार आहे. पुणे येथे जेजूरी व औरंगाबाद येथे याची नोंद झाली आहे, मात्र तलाव, समुद्र यांच्यावर कमी दाब निर्माण झाल्याने चक्रीवादळासारखी परिस्थिती निर्माण होत तो होत. मात्र पावसाचा स्तंभ जमिनीवरून वरच्या दिशेला जातो. ढगातून ढगात असा पाण्याचा स्तंभ जाणे ही पृथ्वीवरीलच नव्हे तर आपल्या आकाशगंगेतील व आपल्या सुर्यमालेतील दुर्मिळातील दुर्मिळ नोंदली गेलेली नैसर्गिक घटना आहे, असे वर्णन प्रा. किरणकुमार जोहरे यांनी केले




आहे. तापमानातील तीव्र फरकामुळे व वातावरणातील अस्थिरतेमुळे तयार झालेल्या क्युमोलोनिंबस या पुर्व मान्सूनच्या ढगांमध्ये ही घटना घडली. सूर्यावरील चुंबकिय वादळांमुळे पृथ्वीच्या वरच्या वातावरणात देखील भोवरे निर्माण होत कमी दाब निर्माण होत आहे. तसेच ढगांचे एकमेकांवर

**जगातले अनोखे आश्चर्य पृथ्वीवर पहिल्यांदाच ! आंतरराष्ट्रीय हवामान शास्त्रज्ञ प्रा. किरणकुमार जोहरे यांचे संशोधन निष्कर्ष व विश्लेषण!**

वैशिष्टपुर्ण थर बनत ढगातून ढगात वरच्या दिशेने पाऊस एखाद्या स्ट्रॉने कोल्ड्रींक ओढावे तसा जलस्राव ओढला गेला अशी शास्त्रीय माहिती व विश्लेषण देखील ही प्रा. किरणकुमार जोहरे यांनी दिले.

### कुठे व कशी घडली घटना?


ढगातून ढगात उलट्या पावसाची नोंद भारतातील महाराष्ट्र राज्यातील नंदूरबार जिल्ह्यात घडली आहे. ७ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी साडे चार वाजता घडलेल्या या घटनेबाबतचे व्हिडीओ व छायाचित्रे



येथील शेतकरी निलय विजय पाटील, संजय पटेल, मनोज भाईदास पाटील व त्यांच्या काही मित्रांनी रेकॉर्ड करून तातडीने आंतरराष्ट्रीय हवामान शास्त्रज्ञ प्रा किरणकुमार जोहरे यांच्याकडे पाठविली. आता ढगफुटी होणार का अशी भिती यावेळी गावातील शेतकर्यांना वाटत होती. शहादा येथे ही घटना घडली. साधारणतः अर्धा तास हा ढगातून ढगात उलटा पावसाचा नैसर्गीक खेळ सुरू होता. शहादा बस स्टॅंड पासून पुर्ला दिशेला साडेचार किलोमीटर अंतरावरून म्हणजे २१.५५४७८४९, ७४.५१२७०५७ या अक्षांश-रेखांशावरून नैऋत्य दिशेला शहादा शहराच्या व डोंगरगांवच्या साधारणपणे तीन किलोमीटर मध्यावर, तसेच जमिनीपासून तीन किलेमीटर ते पाच किलेमीटर उंचीवर ढगातून ढगात हा अद्भुत उलटा पाऊस सुरू होता. हा नैसर्गिक उलट्या पावसाचा अद्भत नजारा दहा ते पंधरा मिनिटे सुरू होता नंतर तो तुटला व शहादा येथे केवळ काही भागात जणू ढगफुटी होत काही मिनिटे जोरदार पाऊस झाला अशी माहिती हवामान तज्ञ प्रा. किरणकुमार जोहरे यांनी दिली.

### प्रा.किरणकुमार जोहरे यांचे संशोधन महत्वाचे!

प्रा.किरणकुमार जोहरे हे भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयांतर्गत येणाऱ्या पुणे येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटिओरॉलॉजी (आयआयटीएम) चे माजी हवामान शास्त्रज्ञ असून आता पर्यंत दुर्लभ नैसर्गिक घटनांवर संशोषनाबद्दल आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांची विशेष ख्याती आहे. ४ ऑक्टोबर २०१० रोजी पुणे ढगफुटीची (१८२ मिलीमिटर पाऊस ९० मिनिटात) आगाऊ सुचना देऊन हजारो लोकांचे जीव वाचविले, कोल्हापूरच्या लांजा येथे जगातली सर्वात मोठी गर पडली याबाबत संशोधन, मेगाक्रायोमेटीयोर बाबत व विजांबाबत तसेच चक्रीवादळे आणि मान्सून बाबत त्यांचा गाढा अभ्यास आहे. प्रा किरणकुमार जोहरे यांच्या कार्याची दखल भारत सरकारने देखील घेतली आहे. हवामानाबाबत अनेक वैयक्तिक पेटंट आहेत. औरंगाबाद येथे डॉप्लर रडार त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींशी संपर्क साधल्याने मंजूर झाले. पृथ्वीच्या दोन्ही ध्रुवावर काम करणारी उपकरणे बनवली आहेत.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# तुफानातील दीप : डॉ. टायरॉन हेज

ते तासनतास त्यांचे निरीक्षण करीत. कधी कधी आपल्या घराच्या व्हरांड्यात आणून त्यांच्यावर प्रयोग करत. जणू ती त्यांची पहिली प्रयोगशाळा होती. बेडूक हा त्यांच्या अभ्यासाचा खास आवडता विषय होता.

पुढील शिक्षणासाठी ते बोस्टनला आले आणि हार्वर्ड विद्यापीठात त्यांनी प्रवेश घेतला. बोस्टन हे मोठे शहर. तिथे राहण्याचा खर्च, लोकांची वर्णद्वेषी वागणूक या गोष्टी त्यांना अस्वस्थ करीत होत्या. शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी काही तरी काम करणे आवश्यक होते. विद्यापीठातील प्रयोगशाळेत त्यांना परीक्षानळ्या धुण्याचे काम मिळाले. प्रयोगशाळेत काही शिकता येईल अशी त्यांना आशा होती. पण तसे काही झाले नाही. या कालावधीत ते एकटे पडले. मनात निराशा दाटून आली. या काळात दोन व्यक्तींनी त्यांना मानसिक आधार दिला. त्यापैकी एक होती त्यांच्याच वर्गात शिकणारी कॅथी किम नावाची विद्यार्थिनी आणि दुसरी व्यक्ती होती हार्वर्ड विद्यापीठातच प्राध्यापक ब्रूस वाल्डमन. प्रा ब्रूस वाल्डमन यांनी टायरॉन यांची गुणवत्ता हेरली होती. टायरॉन हे पुढे निश्चितपणे एक मोठे नामवंत शास्त्रज्ञ होतील असा विश्वास प्रा ब्रूस यांना होता. कॅथी सुद्धा टायरॉन यांना धीर देण्याबरोबरच त्यांना होता होईल ती मदत करत होती.

प्रा ब्रूस हे बेडकांवरच संशोधन करत होते. त्यांनी आपल्या प्रयोगशाळेत टायरॉन यांना मदतनीस म्हणून ठेवले. आता आपल्या आवडीचे काम करायला मिळाल्याने टायरॉनही खुश होते. येथे त्यांच्या संशोधनालाही गती मिळाली. बेडकांवरील संशोधन करून त्यांनी पी एच डी साठी आपला प्रबंध सादर केला. विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट प्रदान केली. याच दरम्यान त्यांचा आणि कॅथीचा विवाह झाला आणि टायरॉन यांच्या जीवनात काही सुखाचे दिवस आले. आता याच विद्यापीठाने त्यांची प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. जीवशास्त्र शिकवणारे जे मोजके कृष्णवर्णीय प्राध्यापक होते त्यात आता टायरॉन यांची सन्मानाने गणना होऊ लागली. त्यांनी लवकरच आपल्या गुणवत्तेच्या आधारावर सर्वोत्कृष्ट प्राध्यापक म्हणून नाव कमावले.

त्याच सुमारास अमेरिकेत आपली कृषी उत्पादने मोठया प्रमाणावर विकणाऱ्या सिंजेटा या बहुराष्ट्रीय कंपनीच्या नजरेत डॉ टायरॉन यांचे संशोधन कार्य आले. कीटकनाशके आणि तणनाशके यांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना आपले उत्पादन पर्यावरणास हानिकारक नाही हे सिद्ध करावे लागे.

**(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## प्रत्येक संघर्षाला धीराने सामोरे जावे

आधुनिक केसरी

प्रत्येकाची बालपणापासूनच स्वतःच्या शैक्षणिक प्रगतीसाठी, सामाजिक विकासासाठी, कौटुंबिक उन्नतीसाठी, आर्थिक विकासासाठी धडपड सुरु असते. प्रत्येकजण यशप्राप्तीच्या दृष्टीकोनातून सतत प्रयत्न करत असतो. व्यक्तिगत गरजा, कौटुंबिक जबाबदाऱ्या, भविष्यासाठी तरतुदी इत्यादी अनेकविध कारणांसाठी प्रत्येकाचाच कस लागत असतो. अर्थात ह्या प्रयत्नांत काही सफल होतात, तर काहींना अधिक प्रयत्न करत राहावं लागतं. प्रगतीसाठी कटिबद्ध असलेल्या प्रत्येकाला यश मिळतंच; फरक इतकाच कि, काहींना ते ओंजळभर मिळतं, तर काहींना रांजणभर. त्या यशापेक्षाही मिळणारा आनंद मोठा आणि महत्वाचा असतो, हे समजून घेणं आवश्यक आहे. ह्या यशप्राप्तीसाठी प्रत्येकाला निरनिराळ्या प्रकारचा संघर्ष देखील करत राहावा लागतो. आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर निराळा संघर्ष असला तरीही प्रत्येकाला कमी-अधिक प्रमाणांत करावाच लागतो. संघर्षाचं स्वरूप वयोगटानुसार बदलत जातं. बालपणीचे संघर्ष अनेकदा शारीरिक / प्राकृतिक स्वरूपाचे असतात. तरुणांना मानसिक आणि आर्थिक पातळीवर संघर्षांचा सामना करावा लागतो. वृद्धोपकाळांत हे संघर्ष स्वास्थ्यासाठी / आयुरारोग्य लाभण्यासाठी करावे लागतात. थोडक्यात, संघर्ष नाही असा माणूस सापडणे विरळाच. प्रत्येक संघर्षाला धीरानं आणि चिकाटीनं तोंड देऊन त्यांवर मात करणं, यश आणि आनंद प्राप्त करणं जरुरीचं असतं. गरज असते वैचारिक बैठकीत स्वतःचा समावेश करण्याची, सकारात्मक विचारांचं आदान-प्रदान करण्याची. त्यासाठी यशप्राप्तीच्या योग्य मार्गाचं दर्शन घडवणारी व्यक्ती भेटणे आवश्यक असतं आणि अशी व्यक्ती भेटणे उपयुक्त देखील ठरतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## केशव माधवा | तुझे ठायी ||

तुझा तूचि जाण | देव अंतरीचा ||
भाव तू मनीचा | शुद्ध ठेव ||१||

घडावा सदैव | संतसमागम ||
वात्सल्याचे धाम | पंढरीत ||२||

आत्म्याच्या अंगणी | ज्ञानाचे चिंतन ||
नामाचे भजन | रात्रंदिन ||३||

लागो तुज छंद | आत्मचिंतनाचा ||
संवाद संतांचा | कानी पडो ||४||

परम सुखाचे | मुळ जाण जीवा ||
केशव माधवा | तुझे ठायी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**आपत्सु मग्नः स्मरणं त्वदीयं**
**करोमि दुर्गे करुणार्णवेशि ।**
**नैतच्छठत्वं मम भावयेथाः**
**क्षुधातृषार्ता जननीं स्मरन्ति ॥१०॥**

दुर्गे माते ! हे करुणासिंधु माहेश्वरी ! जेव्हा मी संकटात सापडतो तेव्हाच मी तुझे स्मरण करतो. हे माझे शाठ्य समजू नकोस, कारण भुकेलेल्या आणि तहानलेल्या मुलाला आईची आठवण येते. || १० || जगदम्ब विचित्रमत्र किं परिपूर्णा करुणास्ति चेन्मयि। अपराधपरम्परा परं न हि माता समुपेक्षते सुतम् ॥११॥ मत्समः पातकी नास्ति पापघ्नी त्वत्समा न हि। एवं ज्ञात्वा महादेवि यथायोग्यं तथा कुरु ॥१२॥ जगदंबे ! माझ्यावर तुझी पूर्ण कृपा आहे, यात आश्चर्य ते काय? कारण मुलगा अनेक अपराध करतो तरी आई त्याची उपेक्षा करीत नाही. || ११ || हे महादेवी ! माझ्यासारखा पापी नाही आणि तुझ्यासारखी पापनाशिनी नाही. असे जाणून जे योग्य असेल ते कर. || १२ ||

# नामाशिवाय कशानेही समाधान नाही



आधुनिक केसरी

मनुष्य चूक करतो, आणि 'देवा, क्षमा कर' म्हणतो; पण पुन्हा पुन्हा चुका करीतच रहातो. हे काही योग्य नव्हे. अशाने काही त्याला देव क्षमा करणार नाही. 'देवा, क्षमा कर' हे म्हणणे इतके सहज होऊन बसले आहे, की त्याचा अर्थच आपल्या ध्यानात येत नाही. तो जर ध्यानात येत असता तर मनुष्य त्या चुका पुन्हा पुन्हा न करता.

अशा रीतीने आपण आपल्या बुद्धीच्या बळावर परमेश्वराला फसवू शकणार नाही. बुद्धीच्या जोरावर जर आपण माणसालाही फसवू शकत नाही तर परमेश्वर कसा फसेल ? आपण आपल्या बुद्धीच्या जोरावर परमेश्वराची प्राप्ती करून घेऊ, असे म्हणणे कदापीही योग्य होणार नाही. तेव्हा शरणागतीशिवाय मार्ग नाही. ते तुम्ही करा.

समाधान काही परिस्थितीवर अवलंबून नाही. कितीही पुराणे वाचली, ग्रंथ मुखोद्गत केले, प्रवचने ऐकली, तरी मनाला समाधान लाभणार नाही. त्याप्रमाणे थोडे तरी आचरण केले पाहिजे. नामात राहिले पाहिजे. नामाशिवाय इतर कोणत्याही गोष्टीने पूर्तता येऊ शकत नाही. नामाशिवाय खरे समाधान मिळणार नाही. तेव्हा तुम्ही भगवंताला अनन्यभावाने शरण जाऊन, त्याचे नाम आवडीने आणि सतत घ्या.

एक गरीब वारकरी पंढरपूरला चालला होता. मोठ्या कष्टाने तो पायी चालला होता. वाटेत एक रेल्वेचे फाटक लागले, ते बंद होते म्हणून तो थांबला. इतक्यात तिथे एक मोटार येऊन उभी राहिली. आत एक मोठा श्रीमंत माणूस बसला होता. तोही पंढरपूरला चालला होता. वारकऱ्याच्या मनात आले, 'देवा, तुझी एवढी निस्सीम भक्ती मी करतो, परंतु माझी ही दशा; आणि हा लबाड व्यापारी, याला मात्र तू ऐश्वर्य देऊन आरामात पंढरपूरची यात्रा घडवतोस. काय तुझा हा न्याय !' एवढ्यात मोटारीचे दार उघडून दोन नोकरांनी त्या माणसाचे हात आपल्या खांद्यावर घेऊन त्याला खाली उतरविले. तो पांगळा होता ! वारकऱ्याने विचार केला, पांगळा होऊन आरामात पंढरपूरला जाण्यापेक्षा गरिबीत पायी जाणे बरे. आपल्याजवळ जे नाही ते ज्याच्यापाशी आहे तो सुखी असला पाहिजे, हे आपण धरून चालतो, पण तसा तो नसतो. त्याचे दुःख आपल्याला माहीत नसते. आणि तो स्वतःला जर सुखी समजत असेल, तर तो दारूच्या मदाप्रमाणे मद समजावा. आहे त्या परिस्थितीमध्ये समाधान मानणे हाच विषयाची पकड ढिली करायचा उपाय आहे. आपली परिस्थिती ही परमात्म्याच्या इच्छेने आली आहे असे आपण म्हणू या. असे जर आपण केले तर दुःखाचा आवेग कमी होईल.

**आजचे बोधवचन :** ज्याचे समाधान भगवंतावर अवलंबून आहे त्याचे समाधान कोणत्याही परिस्थितीमध्ये टिकेल.

**- श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# समर्थ रामदास स्वामी स्थापित प्रसिद्ध अकरा मारुती

आधुनिक केसरी

समर्थ रामदास स्वामी यांनी महाराष्ट्रातील चाफळ आणि जवळच्या परिसरात सातारा, कराड, कोल्हापूर मध्ये 11 ठिकाणी मारुतीच्या मूर्त्यांना स्थापित केले. चला मग जाणून घेऊ या कुठे आहे हे 11 मारुती.

**चाफळचा वीर मारुती / प्रताप मारुती /भीममारुती**

सातारा कराड चिपळूणकडून जाणाऱ्या फाट्याजवळ उंब्रज गावाजवळ चाफळ येथे रामाच्या देऊळासामोरी हात जोडून उभा दास मारुती आणि त्याच देऊळाच्या मागे प्रताप मारुतीची कृष्ण नदीच्या काठावर चुना, वाळू, ताग पासून बनवलेलीही मूर्ती स्थापिली आहे. 6 फुटी ही उंच मूर्ती रामाच्या समोर हात जोडून उभारल्या या मूर्तीचे नैत्र श्रीरामाच्या चरणाकडे स्थिर असल्याचे जाणवते. चाफळच्या रामाच्या देऊळाच्या मागे रामदासांनी बांधलेले हे देऊळ आजतायगत आहे. या देऊळातली मारुतीची मूर्ती भीमरूपी स्तोत्रामध्ये वर्णन केल्या सारखीच आहे. कमरेला सोन्याची कासोटी, किणकिणत घंटा, नेटका, सडपातळ डोळ्यातून अग्निवर्षाव होताना जाणवणे. मूर्तीच्या पायाखाली दैत्य आहे. चाफळ येथे मारुतीच्या दोन मुर्त्यांची स्थापना रामदासांनी केली असून दोन्ही मूर्तीचे रूप वेगवेगळे आहे.

**माजगावचा मारुती**




चाफळपासून 3 कि.मी. लांब एक गावात पाषाणाच्या रूपात असलेल्या दगडाला समर्थांनी मारुतीचे रूप दिले. 5 फुटीची मूर्ती चाफळच्या राम मंदिराकडे तोंड करून उभारलेली आहे. आधीच्या कौलारू, माती विटाच्या देऊळाला जीर्णोद्धार करून नवे रूप देण्यात आले आहे.

**शिंगणवाडीचा मारुती / खडीचा मारुती / बालमारुती**

याला चाफळचा तिसरा मारुती देखील म्हणतात. शिंगणवाडीची टेकडी चाफळ पासून 1 की.मी. च्या अंतरावर आहे. येथे रामघळ समर्थांच्या ध्यानाचे छोटेशे स्थळ आहे. येथे समर्थानी मारुतीची छोटीशी सुबक मूर्तीची स्थापना केली. 4 फुटी उंचीची उत्तरेकडे तोंड केलेली ही मूर्ती जिच्या डाव्या हातात ध्वजासारखी वस्तू दिसण्यात येते. सर्व 11 मारुतीच्या देऊळात हे सर्वात लहान देऊळ आहे. आजूबाजूच्या परिसरात घनदाट झाडे आहे. या देऊळाचा कळस तांबड्या रंगाने रंगविला आहे.

**उंब्रजचा मारुती / मठातील मारुती**

चाफळचे 2 आणि माजगावातील मारुतीचे दर्शन करून परत उंब्रजला आल्यावर इथे जवळच 3 मारुती आहे. त्यातील हा एक उंब्रजचा मठातील मारुती. असंही आख्यायिका आहे की समर्थ चाफळवरून उंब्रजला दररोज स्नानेसाठी येत असत. तेव्हा एकदा ते नदीत बुडताना त्यांना स्वयं हनुमंतानेच वाचविले होते. समर्थांना उंब्रज मधील काही जमीन बक्षीस म्हणून मिळाली होती. तिथे समर्थानी मारुतीच्या देऊळची स्थापना करून चुना, वाळू आणि तागने निर्मित ही मारुतीची देखणी मूर्ती आहे. ह्या मूर्तीच्या पायाखाली दैत्य दिसतो.

**मसूरचा मारुती**

उंब्रजपासून 10 की.मी. असलेले मसूर येथे मारुतीची स्थापना केली आहे. 5 फुटीची चुन्यापासून बनवलेलीही पूर्वाभिमुखी असलेली मारुतीची मूर्ती अतिशय सौम्य प्रसन्न असलेली मूर्तीच्या मस्तकी मुकुट, गळ्यात माळ, जानवं, कमरेला मेखला, पायाखाली जंबुमाळी नावाचा राक्षस दिसतो. **(क्रमशः)**

# पालिकेच्या दुर्लक्षामुळे जनावरांचा रस्त्यावर ठिय्या

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर शहरातील प्रकार; नागरीक त्रस्त**

**भोकर :** शहरात प्रारंभी ग्रामपंचायत अस्तित्वात असताना स्वतंत्र कोंडवाड्याची व्यवस्था होती. आता नगर पालिका होऊन अनेक वर्ष उलटले तरी कोंडवाड्याची व्यवस्था करण्यात आली नाही. पालिकेचे अधिकारी मात्र याकडे कानाडोळा करीत असल्याने मोकाट जनावरांचा भररस्त्यात वावर वाढला आहे. अशा बेपर्वाईमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. मोकाट जनावरांचा त्वरीत बंदोबस्त करून नागरीकांची होणारी गैरसोय दूर करावी अशी मागणी जोर धरते आहे.

शहरातील लोकसंख्या तीस ते चाळीस हजार असताना ग्रामपंचायती मार्फत कामे केली जात होती. मराठवाड्यातील नंबर एक अकलूज आणि नंबर दोन भोकर अशी ग्रामपंचायती ओळख होती. पुरेसा निधी मिळत नसल्याने अत्यावश्यक विकास कामांना खीळ बसली होती. वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन नागरीकांनी पालिकेचा दर्जा मिळावा यासाठी मागणी रेटून धरल्याने उशिरा का होईना पालिका आस्तित्वात आली आणि विकास कामांचा मार्ग मोकळा झाला.

दरम्यानच्या काळात पुरा खालून बरेच पाणी वाहून गेले आहे. आजतागायत पालिकेतील कामाची घडी सुरळीत बसता-बसेना.सध्या पालिकेवर प्रशासक नेमण्यात आल्याने पुन्हा कामाला ब्रेक लागला आहे. नागरीकांची कामे होत नसल्याने तीव्र नाराजी पसरली आहे. पालिकेतील अधिकारी मुख्यालयी राहत नसून ऊंटावरून शेळ्या हाकत असल्याने कर्मचाऱ्यांवर अंकुश राहिला नाही. कामात सुसुत्रता नाही. कुणाचाही कुणावर वचक नसल्याने सावळागोंधळ सुरू आहे. शहरातील बहुतांश वार्डातील समस्या सोडविण्यासाठी कुणीच वाली उरला नाही. अधिकारी केवळ पालिकेत बसून कारभार पाहतात. प्रत्यक्ष शहरात फेरफटका मारायला वेळ मिळत नाही. समस्यातून सूटका करण्यासाठी कुणाकडे दाद मागावी हा प्रश्न भेडसावतो आहे.

**पालिकेत कोंडवाडाच नाही**

ग्रामपंचायत असताना जनावरांसाठी कोंडवाडा होता. आता पालिका झाली तरी तिथे कोंडवाड्याची व्यवस्था करण्यात आली नाही. यामुळे शहरातील मुख्य रस्त्यावर मोकाट जनावरांचा नेहमीच ठिय्या मांडलेला असतो. नगर पालिकेचे अधिकारी मात्र अशा गोष्टीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने वाहतुकीस अडसर निर्माण झाली आहे. अपघात होऊन अनेकदा जनावरांना जीव गमवावा लागला. ही परिस्थिती अशीच राहिली तर आणखी जनावरे दगावण्याची दाट शक्यता आहे. पशुपालकांनी जर दक्षता घेतली तर यावर तोडगा निघू शकतो.

# हितल देवरेची आयआयटी दिल्ली येथे पीएचडीसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** साक्री येथील प्राथमिक शिक्षक सतिष दयाराम देवरे व प्रा. शिक्षीका जयश्री सतीष देवरे यांची कन्या हितल सतीष देवरेंची आयआयटी दिल्ली येथे केमिकल इंजिनिअरींग क्षेत्रात पीएचडीसाठी निवड झाली असून हितल हिच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षावही होत आहे.

हितलचे प्राथमिक शिक्षण नवोदय विद्यालय अक्कलकुवा येथे झाले व उच्च माध्यमिक शिक्षण न्यु इंग्लीश स्कुल साक्री येथे पूर्ण केल्यानंतर नागपुर येथील लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट येथे केमीकल BTech इंजीनीअरींग पूर्ण करून पुणे येथील राष्ट्रीय रासायनीक प्रयोगशाळा (NCL) येथुन एम टेक केमिकल इंजिनिअरिंग पूर्ण केले. त्यानंतर आचार्य पदवीच्या प्रवेश परिक्षेत यश मिळविले व तिची IIT दिल्ली येथे केमिकल विषयात पीएचडी साठी निवड झाली आहे. तिच्या या यशात आई-वडीलांचे मार्गदर्शन तिला लाभले आहे.

# जागृती अंध मुलींच्या शाळेत स्वातंत्र्य दिन व अमृत महोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** एन.एफ.बी.एम. जागृती अंध मुलींची शाळा, आळंदी येथे आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने आणि आजच्या 75 व्या स्वातंत्र्य दिनाच्या प्रसंगी संस्थेचे महासचिव दत्तात्रय जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर दिव्यांग विद्यार्थिनींनी निरनिराळ्या घोषणा दिल्या. सुरुवातीला सामुहिक राष्ट्रगीत गायनानंतर विद्यार्थिनीनी झेंडा गीत व देशभक्तीपर गीते गाऊन वातावरण भारावून टाकले. त्यानंतर विद्यार्थिनींची रिंग कवायत, डंबेल्स यांची प्रात्यक्षिके सादर केली. देशभक्तीपर गीतावर मुलींनी अतिशय सुंदर नृत्य सादर केले व उपस्थितांची मने हिरावून घेतली.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी प्राणांची आहुती दिली अशा विविध स्वातंत्र्य सेनानींची वेशभूषा परिधान केलेल्या मुली आजच्या कार्यक्रमाचे आकर्षण ठरल्या. तिरंग्याच्या तीन रंगांच्या पोशाखात मुलींनी तिरंग्याची प्रतिकृती तयार करून अप्रतिम डान्स सादर केला. आजच्या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित असलेला पालक वर्ग आपल्याच अपत्यांचे कौशल्य स्वतः च्या डोळ्यांनी व मनाने अनुभवत होता. शाळेच्या मुख्याध्यापिका मंगलताई खुंटे यांनी आपल्या देशातील विविधतेतील एकता व अमृत महोत्सवी वर्ष या दोन्ही महत्त्वपूर्ण गोष्टी एकत्र दाखविण्यासाठी पालकांना विविध धान्यांच्या साहाय्याने 75 हा अंक काढण्यास सांगितले. तसेच या अंकामध्ये पालकांच्या हस्ते एकूण 75 दिवे प्रज्वलीत करण्यात आले. अमृत महोत्सवातील हे नयन मनोहर दीपक दृश्य पाहण्यासाठी सर्वांनी एकच गर्दी केली होती त्यामुळे विद्यार्थिनींच्या आनंदात अधिकच भर पडली. खुप चिमुकल्या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर भाषणे दिली व सर्वांचा देशाभिमान द्विगुणित केला.

आजच्या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या आकांक्षा रिहॅबलीटेशन सेंटरच्या संस्थापिका सविता काळे व विशेष अतिथी पी.डी. फाउंडेशनचे अध्यक्ष औदुंबर कळसाइतकर तसेच संस्थेचे महासचिव दत्तात्रय जाधव, उपाध्यक्ष सिद्धू बिराजदार, कोषाध्यक्ष ज्ञानोबा मरडे इत्यादींनी आवर्जून या कार्यक्रमास आपला अमूल्य वेळ दिला. खालील पालकांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा वाढली आणि हा सोहळा संस्मरणीय झाला. यावेळेस संतोष जैद, शांताराम मगर, अशोक जाधव, रामदास करपे, संतोष गीते, श्रीकांत मिश्रा, अर्चना जाधव, मदन झा, अश्विनी मगर, अरुण राजगुरू, पिंकी झा, संतोष पवार, जया काळे, जयश्री गवळी, लैलाबी सलीम शेख, हनुमंत सूर्यवंशी, सुनीता बोबडे, लक्ष्मी मुकुंदा जाधव, सुचित्रा प्रतुल भागवतकर, अश्विनी अभिषेक पेंढारी, प्रतुल भागवतकर, नारायण शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थिनिंना बक्षिसे प्रदान करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थिनींना छान मार्गदर्शन केले तसेच संस्थेचे महासचिव दत्तात्रय जाधव यांनी विदयार्थीनींचे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे भरभरून कौतुक केले.

# औराळा येथे सरपंच सोनाली बागुल यांच्या हस्ते ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज




**औराळा :** अमृत महोत्सवानिमित्त कन्नड तालुक्यातील औराळा ग्रामपंचायत कार्यालय येथे दि.१५ ऑगस्ट सोमवार रोजी सरपंच सोनाली सुरेश बागुल यांच्या हस्ते ध्वजाचे ध्वजारोहण झाले. स्वातंत्र्याच्या अमृत्व महोत्सवी ७५वर्षानिमित्त हर घर तिरंगा अभियान अंतर्गत ध्वजारोहणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामसेवक सुजाता गवई, उपसरपंच आकाश पगारे, वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष देविदास राठोड, ग्रामपंचायत सदस्य दिशांत जिवरख, राजेंद्र भारतीय, विठ्ठल गुजराणे, प्रशांत पगारे, चंद्रकांत बागुल, प्रभाकर बागुल, कैलास बागुल, तात्याभाऊ जिवरख, मुख्याध्यापक पवार, शिक्षक मुळे, प्रधान यांच्यासह आशा कर्मचारी, आरोग्य सेविका, अंगणवाडी मदतनीस व सेविका आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



# बिडकिन ते फुलंब्री १४ स्मार्ट बसेस सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** आज दि.१५ ऑगस्ट रोजी ७५ व्या स्वातंत्र्य दिन व अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सुरु करण्यात आलेल्या स्मार्ट बस सेवा बिडकिन ते फुलंब्री यातील पहिली स्मार्ट बस बिडकिन बसस्थानक येथे दाखल झाली असता यावेळी फुलंब्री ते बिडकिन येथे आलेल्या पहिल्या स्मार्ट बस चे चालक आणि वाहक व वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर ग्रामपंचायत सदस्य मधुकर दादा सोकटकर, गोरख चव्हाण, युवासेना जिल्हा प्रमुख काकासाहेब पाटिल टेके, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष तमिजोद्दीन ईनामदार, शहर वाहतुक शाखा विभागीय अधिकारी राठोड, बिडकिन बस वाहतूक नियंत्रक सोनवणे, सुनील धूत, देविदास चव्हाण, समद अत्तार, अस्लम सय्यद, राहुल ठानगे, आकाश वंजारे, शैलेश काळे, सुरेश निनाले, हिवाळे, सुदाम शिंदे, अयुब शेख, अर्शद शेख, मोहसिन शेख, राजु शेख आदींसह बिडकिन व परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# कन्नड उपविभाग कार्यालयात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कन्नड कार्यालयात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त ध्वजारोहणाचा मान वरिष्ठ सहाय्यक जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कन्नड श्रीमती एम के पाटील यांना देण्यात आला. व या अनुषंगाने ग्रामपंचायत सातकुंड या अंतर्गत अंगणवाडी क्र. 02 मध्ये अंगणवाडीतील बालकांना खाऊ वाटप करुन वृक्षारोपण करण्यात आले, गरजू कुटुंबाना किराणा किटचे वाटप करण्यात आले व कालीमठ येथील मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

सदरील उपक्रमा प्रसंगी उपविभागीय अभियंता एम.एस. बनसोडे, शासकीय अभियंता वाय.आर.आधुडे, शासकीय अभियंता एम.व्ही.देशपांडे, शासकीय अभियंता आर.आर. मंगरुळे, शासकीय अभियंता एस.व्ही. अमृतकर, शासकीय अभियंता डी.डी.कुलकर्णी, करंजीकर, शासकीय अभियंता के.के.नवले, अनिस शेख, ए.बी चौधरी, शासकीय अभियंता एम.एम. उढाण, स्थापत्य आर.जी.कणखर, एस.जी.सोळंकी, एस.ए.धायगुडे, एच.ए.शेजवळ, पी.के. तुपे, बी.एन.बोरकर आदींची उपस्थिती होती.

# प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांच्या पुस्तकाचे राज्यपाल श्रीधरन पिल्लै यांच्या हस्ते प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज



**पणजी :** गोमंतकीय साहित्यिक व पत्रकार प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांच्या 'कृतज्ञ पशु आणि पक्षी आनंदते सृष्टी' या ललितलेख संग्रहाचे प्रकाशन गोव्याचे महामहीम राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिलै यांच्या हस्ते गोवा राजभवनात झालेल्या एका छोटेखानी समारंभात झाले.

यावेळी राज्यपालांनी पुस्तकाचे निरीक्षण करून त्याचा सारांश समजून घेतला. पुस्तकाच्या नावावरून पुस्तकात काय आहे, याविषयी त्यांनी चिकित्सक पद्धतीने माहिती घेतली. या पुस्तकात निसर्ग, मानव यांचा संबंध आणि मनुष्याची निसर्गाविषयी बेफिकिर वृत्ती यावर प्रकाश टाकण्यात आल्याची माहिती क्षीरसागर यांनी राज्यपालांना दिली. आपण हे पुस्तक कोणाकडून तरी वाचून त्याचा मथितार्थ समजून घेऊ असे राज्यपाल यावेळी म्हणाले.

गोव्यातील साहित्यिक प्रकाश क्षीरसागर यांच्या समवेत सौ. चित्रा क्षीरसागर, कालिका बापट, आसावरी कुलकर्णी आणि अपूर्वा ग्रामोपाध्ये उपस्थित होते. या साहित्यिकांनी आपापली पुस्तके राज्यपालांना सप्रेम भेट दिली. राज्यपाल पिल्लै यांनी त्यांनी लिहिलेले 'ओ मिझोरम' हा कवितासंग्रह सर्व साहित्यिकांना दिला. गोव्यातील साहित्यिकांविषयी राज्यपालांनी आस्थेने चौकशी केली. राजभवनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यावेळी सहकार्य केले.



# फाळणीच्या आठवणी शालेय पाठ्यपुस्तकात ?

आधुनिक केसरी

देशात सोमवारी ७५ वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या एक दिवस आधी म्हणजेच १४ ऑगस्टला भारत-पाकिस्तान फाळणीदरम्यान भारतीयांनी भोगलेल्या दु:खाची आणि बलिदानाची आठवण करून देण्यासाठी फाळणीच्या भीषण आठवणींचा दिवस पाळण्यात आला. या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी इतिहासाच्या शालेय पाठ्यपुस्तकात याचा समावेश करावा, अशी मागणी भाजपाचे राज्यसभा खासदार हरनाथ सिंह यादव यांनी केली आहे. यादव यांनी याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र देखील लिहिले आहे. जगातील सर्वात मोठ्या फाळणीच्या क्रुर घटनेबाबत आत्ताच्या आणि पुढच्या पिढींना खरी माहिती मिळाली पाहिजे. १९४७ मध्ये झालेल्या या भयानक घटनेचा पाठ्यपुस्तकात समावेश केल्यानंतरच हे शक्य होईल, असे सिंह यांनी या पत्रात म्हटले आहे. फाळणीचे दु:ख कधीही विसरले जाऊ शकत नाही, असे मोदी यांनी म्हटल्याचा उल्लेखही सिंह यांनी या पत्रात केला. दरवर्षी फाळणीच्या भीषण आठवणींचा दिवस पाळल्याने समाजातील भेदभावाचे विष नष्ट होईल आणि राष्ट्रीय एकात्मता आणखी मजबूत होईल, असा आशावाद सिंह यांनी व्यक्त केला आहे. भारतीय जनतेला फाळणीचे नेमके कारण आणि पार्श्वभूमी माहिती असावी. स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेल्यांची संख्या देशात मोठी आहे. देशाचे विभाजन का झाले? यामागची पार्श्वभूमी काय? लाखो लोकांनी फाळणीमुळे कसा त्रास सहन केला? या दुर्देवी घटनेसाठी नेमके कोण जबाबदार? याबाबत वास्तविक आणि खरी माहिती उपलब्ध नाही, अशी नाराजी सिंह यांनी व्यक्त केली. गेल्या वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या आवाहनानंतर यावर्षी १४ ऑगस्टला दुसऱ्यांदा देशभरात फाळणीच्या भीषण आठवणींचा दिवस पाळण्यात आला. या दिवशी भाजपाने प्रसिद्ध केलेल्या एका व्हिडीओमुळे मोठा वाद निर्माण झाला होता. अखंड भारताच्या फाळणीला जबाबदार घटनांचा आढावा या व्हिडीओतून घेण्यात आला होता. भारताचे दिवंगत माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी मोहम्मद अली जिनांच्या मुस्लीम लीग पुढे झुकून भारताची फाळणी केली, असा आरोप या व्हिडीओमधून करण्यात आला होता. या आरोपांना काँग्रेस नेत्यांकडून जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले होते.

# पत्रा चाळ घोटाळा : राऊतांची सुटका होणे अवघड



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**संजय राऊत, खासदार आहेत, पत्रकार, संपादक आहेत आणि ठाकरे घराण्याच्या निकटचे आहेत म्हणून त्यांनी केलेल्या हजारो कोटी रुपयांच्या अपहरणाची, गरीब भाडेकरू 672 कुटूंबाची फसवणूक करून त्यांना रस्त्यावर आणले आणि बुकिंग अमाऊंट स्वीकारून ही 138 कोटी रूपये देणाऱ्या लोकांनाही फसवलेले स्पष्ट दिसत असताना, ते राजकीय नेते आहेत म्हणून त्यांची चौकशीच करायची नाही काय? मग अशा भ्रष्ट राजकारण्यांवर कारवाई केल्यावर मोर्चे काढणारे, समर्थन देणारे, घोषणाबाजी करणारे योग्य वागत आहेत काय? थोडे गांभीर्याने यावर सर्वसामान्य नागरिकांनी विचार करावा.**



2007 साली म्हाडा (महाराष्ट्र हौसिंग डेव्हलपमेंट अथॉरिटी) ने 672 भाडेकरू राहात असलेली ही पत्रा चाळ, जिचे क्षेत्र 47 एकर एवढे अवाढव्य होते, ती जमीन डेव्हलपमेंटसाठी द्यायचे ठरवले. गुरू आशिष कन्स्ट्रक्शन या डेव्हलपर्सला देण्याचा करार केला. या करारान्वये तेथील 672 भाडेकरूंना घरे (सदनिका/फ्लॅटस्) बांधून द्यायचे, म्हाडाला तीन हजार फ्लॅटस् बांधून द्यायचे आणि शिल्लक जागेवर त्यांनी हवे ते व तसे बांधकाम करून विकायचे. असे ठरले होते. आज 2022 चालू आहे. म्हणजे पंधरा वर्षांपूर्वी केलेला करार आजतागायत अंमलात आणलेला नाही.

या गुरू आशिष कन्स्ट्रक्शन कंपनीचे प्रमुख डायरेक्टर श्री. प्रविण राऊत हे संजय राऊत यांचे अत्यंत जवळचे आणि विश्वासातील गृहस्थ आहेत. त्यांनी ही 47 एकर जमिन विविध नऊ खाजगी बिल्डर्सना 901.79 कोटी रूपयांना परस्पर विकली. ही चाळ मुंबईत गोरेगाव मधील सिध्दार्थनगरमध्ये आहे. या जमीनीवर गुरू आशिष कन्स्ट्रक्शन कंपनीने कांही बांधकाम चालू करण्याचा फार्स करून, लोकांकडून बुकिंग अमाऊंट म्हणून 138 कोटी रूपये स्विकारले. परंतु जमीन तर पूर्ण 47 एकर नऊ खाजगी बिल्डर्सना विकली होती. म्हणजे 901.79 + 138 = 1039.79 कोटी रूपये स्वीकारले, घेतले आणि म्हाडासोबतच्या कराराला वाटाण्याच्या अक्षता दाखवल्या. या एक हजार एकोणचाळीस कोटी एकोणऐंशी लाख रुपये गुरू आशिष कन्स्ट्रक्शन कंपनीच्या डायरेक्टर लोकांता विभागले गेले. त्यापैकी शंभर कोटी प्रविण राऊत यांचेकडे आले. नंतर प्रविण राऊत यांच्या पत्नीचे बँक खात्यातून, माधूरी प्रविण राऊत यांनी संजय राऊत यांच्या पत्नी सौ. वर्षा संजय राऊत यांचे बँक खात्यात रू 83 लाख वर्ग केले. बोंबाबोंब झाल्यावर या रकमेपैकी 55 लाख परत करण्याचे नाटक केले. पण तोपर्यंत ईडीने सर्व डिटेल्स मिळवले होते. या 83 लाखाने दादर येथे संजय राऊत आणि सौ. वर्षा राऊत यांनी एक फ्लॅट विकत घेतला. आणि पाटकर यांचे भागीदारीत दुसरीकडे आठ प्लॉट विकत घेतले. या सर्व व्यवहारात ॲग्रिमेंट रकमेपेक्षा किती तरी जास्त रक्कम रोखीने देण्यात आल्याचे उघड झाले आहे. जेथे हे प्लॉटस् आहेत तेथील मार्केट प्राईज आणि इतरांचे खरेदी खतांच्या किंमती कितीतरी जास्त आहेत.

या सर्व व्यवहारात वाघवान बंधूही सामिल असून त्यांनी संजय राऊत यांना मदत केलेली आहे. आणि म्हणूनच ऐन कोरोनाच्या कडक लॉकडाऊनमध्ये त्यांना महाविकास आघाडी सरकारने स्पेशल परवानगी दिली होती. महाबळेश्वर आणि ईतर ठिकाणी फिरायला जाण्याची. हेच वाघवान बंधू पंजाब महाराष्ट्र को ऑप.बँक घोटाळ्यातील आरोपी आहेत. बरे करार 2007 मधला. तो पाळला नाही म्हणून म्हाडाने 2018 साली गुरू आशिष कन्स्ट्रक्शन कंपनीचे विरोधात एफआयआर दाखल केलेला आहे. सकृतदर्शनी यात मनीलॉन्ड्रींग सदृश व्यवहार दिसत असल्याने ईडीने कारवाई केलेली आहे. मग सांगा यात सूडबुद्धीने कारवाईचा विषय येतोच कुठून.

संजय राऊत, खासदार आहेत, पत्रकार, संपादक आहेत आणि ठाकरे घराण्याच्या निकटचे आहेत म्हणून त्यांनी केलेल्या हजारो कोटी रुपयांच्या अपहरणाची, गरीब भाडेकरू 672 कुटूंबाची फसवणूक करून त्यांना रस्त्यावर आणले आणि बुकिंग अमाऊंट स्वीकारून ही 138 कोटी रूपये देणाऱ्या लोकांनाही फसवलेले स्पष्ट दिसत असताना, ते राजकीय नेते आहेत म्हणून त्यांची चौकशीच करायची नाही काय?

2007 साली भाजप सरकार नव्हते केंद्रात. आणि एफआयआर दाखल झाला 2018 मध्ये. तेव्हा महाविकास आघाडीचे सरकारही महाराष्ट्रात नव्हते. मग नरेंद्र मोदींचे केंद्र सरकार ईडीचा गैरवापर करून विरोधकांवर सूड उगवत आहे ही बोंब करणे गैर नाही काय ? असेच नवाब मलिक यांचेही बाबत आहे. त्यांनीही कुख्यात गुंड डॉन दाऊद इब्राहिम याचे जवळचे नातेवाईकांशी खरेदीविक्री व्यवहार केले. दहशतवाद्यांना फंडींग केले हे दिसत असतांना त्यांना जेलमध्ये टाकून चौकशी करायची नाही काय?

मग अशा भ्रष्ट राजकारण्यांवर कारवाई केल्यावर मोर्चे काढणारे, समर्थन देणारे, घोषणाबाजी करणारे योग्य वागत आहेत काय? थोडे गांभीर्याने यावर सर्वसामान्य नागरिकांनी विचार करावा. नरेंद्र मोदींचे सरकार कोणावरही अयोग्य सूड उगवत नाही आहे हे लक्षात घ्यावे. याच पध्दतीचे व्यवहार उध्दव ठाकरे आणि त्यांच्या पत्नीनेही अलीगडला बंगले, प्लॉटस्, जमिनी घेतल्या आहेत. त्यांचीही आज ना उद्या चौकशी होणारच. सध्या तरी अनिल परब, उध्दव ठाकरेंचे मेव्हणे, आदी रडारवर आहेत.

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव : मागे वळून पाहताना

आधुनिक केसरी

**१५ ऑगस्टला भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचा सांगता समारंभ झाला. हा दिवस जसा आनंदाचा आणि उत्सवाचा होता तसाच तो आपल्या उपलब्धींचा आढावा घेण्याचाही होता. हा आढावा मुख्यत्वे दोन प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी असतो. एक आपण पंचाहत्तर वर्षांत काय मिळवले ? पण याचे उत्तर संदर्भरहित असू शकत नाही. त्यातून दुसरा प्रश्न निर्माण होतो. गेल्या पंचाहत्तर वर्षात आमच्यासारखेच दीडशे देश स्वतंत्र झाले, ते कुठे आहेत आणि त्यांच्या तुलनेत आम्ही कुठे आहोत? या काळात आमच्याबरोबर स्वतंत्र झालेले काही देश फुटले. काही लष्करी राजवटीखाली गेले, काहीना यादवीने ग्रासले. काही दिवाळखोर झाले. छोट्या देशाच्या ठिकऱ्या उडाल्या. एक बलाढ्य साम्राज्य छिन्नविछिन्न झाले. काही, स्पर्धेत, आमच्यापेक्षा पुढेही गेले.**

डॉ. हरिहर कुंभोजकर
कोल्हापूर, मो. 9834336547

असे म्हणतात की, आम्ही स्वतंत्र झालो तेव्हा माजी ब्रिटिश पंतप्रधान विस्टन चर्चिल यांनी आमची कुंडली मांडून भविष्य वर्तवले होते : (स्वातंत्र्य मिळाल्यावर भारतात) हरामखोर, हलकट, लुटारू लोकांच्या हातात सत्ता जाईल. सर्व भारतीय नेते अपात्र आणि कणा नसलेले असतील. त्यांच्या जिभेवर साखर आणि हृदयात मूर्खपणा असेल. ते सत्तेसाठी भांडत बसतील आणि क्षुल्लक कारणावरून केलेल्या राजकीय भांडणात भारत हरवून जाईल. भारतात असा एक दिवस येईल की, पाणी आणि हवेवरही कर भरावा लागेल.

चर्चिलचे भविष्य खरे करण्याचा चंग बांधलेले लोक या देशात नेहमीच राहिले होते. काही चुका भ्रामक आदर्शवादापोटीही झाल्या. पण एकूण जमाखर्च पाहिला तर चर्चिल, आम्ही, खोटाच ठरविला. भारत हरला नाही आणि हरवूनही गेला नाही. किंबहुना आज तो जागतिक पातळीवर आपले अस्तित्व अधोरेखित करत आहे.

देश स्वतंत्र झाला त्यावेळी आमच्यापुढील प्रश्न हिमालयाएव्हढे प्रचंड होते. देशाच्या फाळणीने दोन कोटी लोक आपल्या घरादाराला मुकले होते. लाखो लोकांना आपले प्राण गमवावे लागले होते. असंख्य स्त्रियांच्या अब्रूवर घाला झाला होता. आम्हाला राज्य चालवण्याचा शतकानुशतके अनुभव नव्हता. फाळणीने देशाचे तीन तुकडे केले होतेच. पण प्रत्यक्षात लहान मोठे पाचशेहून जास्त तुकडे होते. तेथील शासकांना संस्थानिक म्हणत. ब्रिटिश गेल्यावर ते स्वतंत्र होणार होते. गुंठाभर जमिनीसाठी जेथे खून-मारामाऱ्या होतात तेथे आपले संस्थान कोणी सुखासुखी सोडणार नव्हते. गुजराथमधील जुनागढ संस्थान पाकिस्तानात विलीन झाले होते. हैदराबादच्या निझामाला स्वतंत्र राहायचे होते. त्रावणकोरच्या महाराजाने थेट अमेरिकेच्या अध्यक्षालाच पत्र लिहून त्यांच्यात विलीन होण्याचा प्रस्ताव दिला होता. जोधपूरचा नरेश कोण चांगले "डील" देतो याच्या शोधात होता. जिन्नांनी त्याला कोऱ्या कागदावर सही करून सामिलीकरणाचा प्रस्ताव पाठवला होता. काश्मीरवर तर आक्रमणच केले होते. या सर्व गोष्टीवर मात करून फार कौशल्याने आम्ही एक सलग देश निर्माण केला आणि तो टिकवला. एकोणीसशे छप्पन्न साली तत्कालीन सोवियत रशियाचे अध्यक्ष निकिता ख्रुश्चेव्ह भारतात आले होते. त्यांनी चकित होऊन विचारले होते : संस्थानिकांना अदृश्य न करता तुम्ही संस्थाने अदृश्य करण्याची जादू कशी काय करू शकला ?

पंचाहत्तर वर्षांपूर्वी आमच्यात शंभरातील अठ्ठ्याऐंशी लोक निरक्षर होते. आमचे सरासरी आयुर्मान बत्तीस वर्षाचे होते. ब्यायशी टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते. आज भारतात शहात्तर टक्के लोक साक्षर आहेत. ऐंशी टक्के लोकाना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यात आम्ही यश मिळवले आहे. भारताचे आयुर्मान सत्तर वर्षाला पोचले आहे. हे २०११च्या खानेसुमारीचे आकडे आहेत.

आमची तुलना चीनच्या प्रगतीशी केली जाते आमच्याबरोबरच स्वतंत्र झालेला चीन आर्थिक दृष्ट्या आमच्या सहापट पुढे असल्याने सांगितले जाते. पण त्यासाठी चिनी जनतेने काय किंमत दिली आहे हे अजून उघड व्हायचे आहे.

एकच उदाहरण पुरेसे आहे. साठच्या दशकात चीनने अन्नधान्यात स्वयंपूर्ण होण्यासाठी सामुदायिक शेतीचा कार्यक्रम हाती घेतला. तेव्हा लक्षात आले की, एक चिमणी वर्षाला सरासरी साडेचार किलो धान्याचा फडशा पाडते. झाले. 'चिमण्या हटाओ' मोहीम हाती घेतली. लहान मुलापासून म्हाताऱ्यापर्यंत सारी लाठ्या, काठ्या, दगड, धोंडे, बंदुका, मिळेल ते हातात घेऊन चिमण्या मारू लागली. डबे वाजवून, फटाके वाजवून, आकाशात उडणाऱ्या चिमण्या जमिनीवर उतरणार नाहीत याची काळजी घेतली गेली. उडून दमल्यावर त्या खाली पडत. त्यानंतर त्यांना मारण्यात येई. चीनमध्ये एकही चिमणी उरली नाही. कोट्यवधी चिमण्या आणि अन्य पक्षीही नष्ट झाले. त्यानंतर टोळधाड आली. उभे पीक नष्ट झाले. चिमण्या टोळ खात असत. आता टोळांना शत्रू नव्हता. त्यांनी उभ्या पिकातील साठ टक्के पीक फस्त केले. अभूतपूर्व दुष्काळ पडला. अधिकृत माहितीनुसार दीड कोटी लोक उपासमारीने मेले. अनिधकृत आकडा पाच कोटींचा आहे. पण, शासनाला त्याची फिकीर करण्याचे कारण नव्हते. कारण सरकार लोकांना जबाबदार नव्हते. शेवटी रशियातून चिमण्या आयात कराव्या लागल्या. त्यानंतर परिस्थिती हळू हळू पूर्वपदाला आली.

या उलट १९६५ सालच्या पाकिस्तानविरुद्ध युद्धाच्या काळात भारतात दुष्काळ होता. अमेरिका पाकिस्तनाचे दोस्त-राष्ट्र असल्याने त्याने भारताला होणारी अन्नधान्याची मदत बंद केली. त्यावेळचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी जनतेला आवाहन केलेः आठवड्यातून एक दिवस उपवास करा. ते स्वतः उपास करू लागले. लोकांनीही प्रतिसाद दिला. त्यानंतर योजना आखून भारताने हरित क्रांती घडवून आणली. आज भारत अन्नधान्य निर्यात करतो.

आम्ही अनेक चुका केल्या. पण त्या आम्ही दुरुस्त करू शकू असा विश्वासही मिळवला. गाडीला ब्रेकच नसतील तर गाडी वेगात पळू शकते. पण ती भीषण अपघातही करू शकते. लोकशाहीत ब्रेक असतात. त्यामुळे अधूनमधून वेग कमी होतो, पण मोठे अपघात टळतात. आज चीनने डोळे दिपवणारी प्रगती केली आहे. पण त्याची काय किंमत मोजली आहे हे अजून उघड व्हायचे आहे. तियान-आन-मेन चौकात शांततामय निदर्शने करणाऱ्याना रणगाडे घालून का चिरडावे लागले होते याचा जेव्हा उलगडा होईल तेव्हा ते उघड होईल. आम्ही लोकशाहीचा मार्ग निवडला. रॉबर्ट बॅरो या अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाने सुमारे शंभर देशांचा अभ्यास करून लोकशाही आणि सशक्त आर्थिक वाढ यांचा सरळ संबंध दाखवून दिला आहे. आम्हाला अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. आज चिमण्या धान्याचे चार दाणे खातही असतील. पण आम्ही टोळधाडीपासून देशाला वाचवले आहे. आणि ही उपलब्धी किरकोळ नाही.

अकृत्वा परसंतापम् ।
अगत्वा खलनम्रताम् ।।
अनुसृज्य सतां वर्त्म ।
यदल्पमपि तत् बहुः ।।

दुसऱ्याला दुःख न देता, दुष्टांचे पाय न धरता, सज्जनांनी सांगिलेला मार्ग न सोडता, जे आम्ही मिळवले आहे ते थोडे दिसले तरी खूप आहे. म्हणूनच आम्ही उंच आवाजात म्हणू शकतो :भारतीय स्वातंत्र्य चिरायु होवो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मोदीजींची तळमळ आणि काहींची मळमळ!



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**सोमवारी देशांत स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा झाला. घर घर तिरंगा या संकल्पनेमुळे संपूर्ण देश तीन रंगात न्हाऊन गेला. दिवाळी , दसरा, पाडवा हे सण वैयक्तिक स्तरावर साजरे होतात पण स्वातंत्र्यदिन अथवा प्रजासत्ताकदिन मात्र जणू शासकीय किंवा संस्था पातळीवरच साजरे करायचे असतात असा अलिखित नियमच जणू झाला होता. त्यामुळे या दिवसांचा प्रेरणा मिळण्यासाठीचा उद्देशच मारला जात होता परंतु ते चित्र आज बदलले गेले पण त्यामुळे राजकारणाच्या पलीकडे ज्यांचा दृष्टीकोन जात नाही त्यांचा पोटशूळ उठला यात नवल नाही.**

अगदी अलीकडील काळापर्यंत काश्मीरमध्ये श्रीनगर शहरात लाल चौकात तिरंगा फडकवण्यासाठी आंदोलन करावे लागले. तेथे तिरंगा दिमाखाने डौलात फडकत होता. फरार असलेल्या अतिरेक्यांच्या घरातील मंडळी तिरंगा फडकवत होते ! या गुणात्मक बदलाचे श्रेय निश्चित मोदीजी यांच्याकडे जाते हेही काहींची समस्या आहे कारण देशहितापेक्षा त्यांचे राजकारण त्यांना महत्वाचे वाटत आहे.

सोमवारी मोदीजी यांचे सुमारे ८३ मिनिटे लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून भाषण झाले. सलग ९ वे भाषण ते लाल किल्ल्यावरून करत होते. या वयात सलग असखलीत ८३ मिनिटे बोलणे हाच एक विक्रम आहे. एखादी व्यक्ती आपल्या मनातील संकल्पना १३० कोटी एव्हढया लोकसंख्येला सलग टप्प्या टप्प्याने समजावून सांगतो. त्यांना सहभागी करून घेतो आणि स्वतः त्या जनतेच्या इच्छा आकांक्षाचे प्रतीक बनतो हे सोपे नाही. असा विश्वास संपादन करण्यासाठी प्रचंड पारदर्शी आणि कार्यक्षम राहण्याची गरज असते. ज्यांची ही क्षमता नाही, ज्यांना हे कधीच जमणार नाही अशी माणसे टीका टिप्पणी करत राहतात. लोकांना याची पण सवय झाल्यासारखे झाले आहे.

मोदीजी यांनी कालच्या लाल लिल्ल्यावरच्या भाषणात काही महत्वाचे मुद्दे मांडले . मुख्य म्हणजे अमृत महोत्सव ते शताब्दी या काळाला त्यांनी अमृतयोग असे नाव दिले आणि जणू २५ वर्षाची एक ब्लू प्रिंटच सर्वांच्या समोर मांडली. भारताच्या आत्मनिर्भर अभियानाला संरक्षण क्षेत्रात मिळालेले अभूतपूर्व यशाचा त्यांनी विशेष उल्लेख करताना स्वातंत्र्य मिळाल्यावर ७५ वर्षांनी लाल किल्ल्यावर स्वदेशी शस्त्रातून सलामी मिळाली याची आठवण त्यांनी करून दिली. सर्व भारतीयांनी अभिमान बाळगावा अशीच ही घटना आहे.

सर्वच क्षेत्रात भारत एक महाशक्ती म्हणून कसा उभा राहत आहे याचा त्यांनी थोडक्यात आढावा घेतला. भारतीय खेळाडू यांची क्रीडा क्षेत्रातील कामगिरी आसनी विज्ञानातील भारतीय संशोधकांची कामगिरी हे समांतर प्रगतीचे रस्ते त्यांनी अधोरेखित केले. पण पाच ढोबळ मुद्दे जे सांगितले ते महत्वाचे होते. आपली परंपरा नदीला आई मानते आणि शिवात जीव समजते हे सांगताना त्यांनी आपल्या परंपरा याच उद्याचे जगाचे प्रश्न सोडवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत त्यामुळे कुठलाही न्यूनगंड न बाळगता आपण त्याचा अभिमान बाळगला पाहिजे असे ते म्हणाले.

एकम सत् विप्रः बहुधा वदन्ति। यावर विश्वास असणारी आम्ही माणसे आहोत याची आठवण करून देताना समाजात एकता आणि एकजूट कशी आवश्यक आहे ते सांगितले. भूतकाळातील गुलामीचे



अंश काही प्रमाणात अजून शिल्लक आहेत त्यातून मानसिकदृष्ट्या आणि सर्वार्थाने मुक्ती मिळवणे आवश्यक आहे हे त्यांनी सांगितले. विकसनशील भारताकडून उद्याच्या विकसित भारताकडे आम्हाला जायचे आहे यासाठी काय लक्ष आम्ही ठेवले पाहिजे हे त्यांनी मांडले, पण यासाठी सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या कर्तव्याची आठवण पण त्यांनी करून दिली. अर्थात ही वाटचाल होण्यासाठी नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे २५ वर्षानंतरच्या पिढी घडवण्याचा पाया असणार आहे याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

ही सगळी मांडणी, गेली ९ वर्षाची त्यांची लाल किल्ल्यावरील भाषणे आणि 'मन की बात' यातून ते जनतेशी करत असलेला थेट संवाद यामुळे मोदी आणि भारतीय नागरिक हे थेट (कुठल्याही व्यवस्था, माध्यमे यांच्याशिवाय) जोडले गेले आहेत. मोदींना काय म्हणायचे आहे किंवा जनतेच्या काय अपेक्षा आहेत याचे थेट संवाद आता होत असल्यामुळे अनेकांच्या मनात याचे दुःख आहे आणि त्यामुळेच त्यांची मळमळ व्यक्त होत आहे. मोदींच्या भाषणावर प्रतिक्रिया देणारे आणि टीका करणारे यांच्या दुखवणारी नस मोदीजी यांनी पकडली आहे आणि त्यातून या साऱ्या मंडळींची अस्वस्थता बाहेर पडत आहे.

मोदीजी यांनी तीन खंत व्यक्त केल्या आहेत. तिन्ही गोष्टीचे काही वेगळे संदर्भ आहेत. काही घटनांची पार्श्वभूमी पण त्याला आहे. एक आहे नारीसन्मान, दुसरा आहे भाई भातिजा म्हणजेच अर्थात परिवारवाद आणि तिसरा आहे भ्रष्टाचाराची आमच्या व्यवस्थेला लागलेली कीड ! या तिन्ही मुद्द्यावर लढताना त्यांचा मार्ग किती कठीण आहे हे त्यांनी ओळखल्यामुळे थेट जनतेच्या दरबारात त्यांना या मुद्द्यांना घेऊन जायचे आहे आणि त्यासाठी सर्व प्रकारचे राजकीय धोके स्वीकारण्याची त्यांची तयारी झाली आहे असे वाटते आणि म्हणूनच या बाबतीत त्यांनी जनतेलाच साकडे घातले आहे. भ्रष्टाचार आम्हाला नको आहे पण तो करणाऱ्यांचीच नकळत आम्ही भलावण करत असलो तर हा शुद्ध ढोंगीपणा आहे असे त्यांचे प्रतिपादन होते. प. बंगालमधील पार्थ चटर्जी प्रकरण, केजरीवाल यांचे सत्येंद्र जैन आणि मंडळींचे उदात्तीकरण किंवा सत्तेसाठी नितीशकडून लालूचे उदात्तीकरण आणि महाराष्ट्रात भ्रष्टाचाराचे मविआकडून होणारे निर्लज्ज समर्थन, त्याचबरोबर नॅशनल हेराल्ड हा उघड उघड आर्थीक गुन्हा दिसत असताना काँग्रेसने मांडलेला आंदोलनाचा तमाशा हे सर्व कदाचित मोदीजी यांच्या समोर असावे. हे दोन्ही मुद्दे परिवरवादी वृत्ती आणि भ्रष्टाचार हे केवळ राजकारणापूरते नाही तर कला आणि क्रीडापासून सर्वच क्षेत्रात बोकाळले आहेत असे मोदीजी म्हणतात आणि त्यामुळे आमचा गुणवान तरुण मागे पडतो त्याची संधी कुणी तरी हिरावून घेते हे त्यांचे दुःख आहे, पण खाई त्याला खवखवे या न्यायाने प्रतिक्रिया मात्र राजकीय क्षेत्रातून यायला सुरुवात झाली आहे.

परिवारवाद आणि भ्रष्टाचार या एकाच नाण्याच्या बाजू आहेत ज्या तळमळीने मोदींनी सांगितले त्यांच्या या उघड बोलन्यामुळे दीदी ते दादा सगळ्यांची मळमळ बाहेर पडत आहे. आमचे महाराष्ट्रातील टोमणे बहाद्दर यांची स्थिती तर सहन न होण्यासारखी आणि सांगता न येण्यासारखी झाली आहे. थेट ब्रिटिश मंडळींशी मोदी यांची ते तुलना करत आहेत. काँग्रेसची वकीली करणे किंवा काँग्रेस संपत असल्याची खंत वाटणे म्हणजे समान शिले व्यसनेषु सख्यः । असे तर नाही ना ? सामान्य सैनिकांना हे किती मान्य असेल?

मोदींना लक्ष करणे जंनतेला मान्य नाही, सामान्यांना ते आवडत नाही ही साधी गोष्ट या मंडळींना इतक्या दिवसात न समजणे ही त्यांची कदाचित असहायता असावी.

या दोन्ही भ्रष्टाचार आणि परिवारवाद मुद्द्यावर बोलणारे मोदी हे बोलण्यासाठी आवश्यक असणाऱ्या व्यक्तिगत नैतिक अधिकाराचे धनी आहेत. राजकारणात ३७ वर्षे आणि त्यातील २० वर्षे थेट सत्ताकरणात घालवून ही त्यांच्यावर एक रुपयांचा भ्रष्टाचाराचे आरोप नाहीत. त्यांची कुठे इस्टेट, प्रॉपर्टी, भागीदारी नाही. परिवार म्हणाल तर तो त्यांनी संघाचे प्रचारक निघाल्यापासूनच तोडला आहे. त्यामुळे आपल्या घरातील कुणाला पुढे करायचे? आपल्या राजकीय वारसदाराचे भविष्य कसे घडवायचे हा अजेंडा किंवा समस्या त्यांची नाही. आणि हेच जनतेला भावते आहे, आवडते आहे आणि जनता हा इतर राजकारणी आणि मोदी यांच्यातील याच महत्वपूर्ण फरकाने मोदी यांचे चाहते बनले आहेत. त्यामुळेच एकीकडे मोदीजी यांची तळमळ आहे तर दुसरीकडे हे पचायला जड असल्याने मळमळ आहे.

अर्थात पक्ष म्हणून मोदींना या मुद्द्यांवर काही प्रमाणात घेरले जाऊ शकते आणि हेच मोदी यांच्यासमोर पुढील काळात मोठे आव्हान असणार आहे. महाराष्ट्रात संजय राठोड आणि सत्तार याना स्वीकारणे किंवा भाजपात आलेल्या, असलेल्या मंडळींचा परिवारवाद यावर पर्याय शोधणे आणि कठोर राजकीय निर्णय घेणे हे पुढील काळात कसे घडते यावर या तीनही मुद्द्यांची यशस्वी वाटचाल अवलंबून आहे .

तूर्तास नेहमीप्रमाणे एक तत्वज्ञ, एक प्रधान सेवक, एक मुरब्बी राजकारणी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे एक भारतमातेच्या वैभवासाठी धडपडणारे उपासक असे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या व्यक्तीमत्वाचे वैविध्यपूर्ण दर्शन पुन्हा एकदा या निमित्ताने संपूर्ण जगाला झाले. त्यांच्या डोक्यावरील फेट्याच्या रंग छटा आणि त्यांच्या या व्यक्तिमत्वाच्या छटा याचा विविधता हा समान धागा म्हणावा लागेल. देशाला लाभलेल्या अशा नेतृत्वाची आम्हा भारतीयाना दिर्घकाळ गरज आहे हे निश्चित !

# पडद्यावरचं देशप्रेम



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**हिंदी चित्रपटसृष्टीचा देशभक्ती' हा विषय आवडता आहे. त्यामुळे स्वातंत्र्यापूर्वीपासून ते आजपर्यंत देशभक्ती सांगणारे असंख्य चित्रपट आले. प्रेक्षकांनीही त्याला पसंदी दिली, हे काही वेगळे सांगण्याची गरज नाही. मनोजकुमार यांचे अनेक देशभक्तीवरचे चित्रपट आले. 'शाहिद', 'उपकार', 'पूरब और पश्चिम', 'क्रांती', 'देशवासी' यासारखे अनेक देशभक्तीपर चित्रपट गाजले. त्यामुळे त्यांना मनोज नाहीतर 'भारतकुमार' म्हटले जाऊ लागले. आज काळ बदलला तशी देशभक्तीची व्याख्याही बदलली. पण रसिकांनी हा बदलही स्वीकारला. शौर्यगाथा मात्र त्यांना अधिक भावल्या. देशभक्ती म्हणजे बॉर्डरवरील ऐतिहासिक युद्धपट किंवा स्वातंत्र्य मिळवण्यासाठीचा संघर्ष नव्हे. सध्याच्या काळात विविध घटकांवर होणारा अन्याय-अत्याचार, भ्रष्ट कारभार मोडून काढणे हीसुद्धा एक देश सेवाच मानली जाते. त्यामुळे सलमान खान यांचे 'जय हो' सारखे चित्रपटही याच पठडीत येतात.**


1945 मध्ये 'किस्मत' आला होता. या चित्रपटातील 'दूर हटो ऐ दुनिया वालों हिन्दुस्तान हमारा है' हे गीत प्रचंड गाजले होते. त्यावेळी आपण इंग्रजांच्या पारतंत्र्यात होतो. 1997 मध्ये आलेल्या जे. पी. दत्ता यांच्या 'बॉर्डर' चित्रपटाने मोठा भाव खाल्ला.या चित्रपटातील गाणी विशेषतः 'संदेसे आते हैं...' हे गाणे आजही 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारीला वाजवले जाते. या चित्रपटाचा सीक्वेन्स खरा वाटावा यासाठी दत्ता यांनी भारतीय सैनिकांचीही मदत घेतली होती आणि त्यांनाही चित्रपटात सामिल करून घेतले होते. एवढेच नाही तर एमएमजी रायफल, एलएमजी रायफल, रॉकेट लाँचर, 393 रायफलही वापरण्यात आली. ही शस्त्रे अस्सल होती, जी जे.पी. दत्ता यांनी विनंती करून ती शिपाई आणि प्रशासनाकडून मिळवली होती. असे म्हणा की 'बॉर्डर'मधील बहुतांश सैनिक आणि शस्त्रे खरी होती. 2003 मध्ये आलेला 'एलओसी कारगिल' या चित्रपटानेही लोकप्रियता मिळवली. भगतसिंग ही चित्रसृष्टीची आवडती व्यक्तिरेखा. त्यांच्यावर 2002 मध्ये अजय देवगणचा 'द लिजेंड ऑफ भगतसिंग', बॉबी देओल आणि सनी देओल यांचा '23 मार्च 1931 शहीद' हे दोन चित्रपट आले. मात्र अजय देवगणच्या चित्रपटाने बाजी मारली. 1965 साली एस.राम शर्मा यांनी भगतसिंग यांच्या आयुष्यावर 'शहीद' चित्रपट बनवला. 1962 साली चेतन आनंद यांचा 'हकीकत'आला. धमेन्द्र आणि संजय खान यांनी या चित्रपटात भूमिका केल्या होत्या. भारत-चीन युद्धावर हा चित्रपट आधारला होता. त्या काळात हिंदी चित्रपटांच्या तंत्रज्ञानात म्हणावी तशी प्रगती झाली नव्हती पण तरीही चेतन आनंद यांनी युद्धाचे प्रसंग अतिशय सुरेखपणे चित्रित केले होते. त्यामुळे हा चित्रपट आजही सर्वोत्तम युद्धपट म्हणून गणला जातो. यातील 'कर चले हम फिदा' हे गाणे आजही प्रेक्षकांच्या तोंडी आहे. मदर इंडिया, सात हिंदुस्थानी, नया दौर, दीवार, लेट्स ब्रिन्ग अवर हिरोज बॅक,1971 अशा चित्रपटांमधूनही चित्रपट निर्मात्यांनी वेगवेगळ्या प्रकारे देशभक्ती पडद्यावर आणली.

1965 मध्ये मनोजकुमार यांनी क्रांतिकारक भगतसिंग यांचे जीवन चित्रपटाद्वारे प्रेक्षकांसमोर आणले. आजही स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन आला की, 'मेरे देश की धरती' हे गाणे वाजते. हे. क्रांतिकारक भगतसिंग यांच्या जीवनावर राजकुमार संतोषी आणि सनी देओल यांनी 2002 मध्ये आपले चित्रपट प्रदर्शित केले होते. त्यापैकी संतोषींच्या दि लिजंड ऑफ भगतसिंग' या चित्रपटामधील भगतसिंगांच्या व्यक्तिरेखेने अभिनेता अजय देवगणला त्याच्या कारकिर्दीमधील पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळवून दिला होता.

झांसी की रानी (1953) हा सोहराब मोदी यांनी त्यांच्या मिनर्व्हा मूव्हीटोन प्रोडक्शन बॅनरसाठी निर्मित आणि दिग्दर्शित केलेला भारतीय हिंदी भाषेतील ऐतिहासिक चित्रपट आहे. या चित्रपटाला भारतात बनवलेला पहिला टेक्निकलर चित्रपट म्हणून श्रेय दिले जाते. त्यात मोदींची पत्नी मेहताब यांनी मुख्य भूमिकेत तर मोदींसह त्यांचे मार्गदर्शक, राजगुरू यांच्या प्रमुख भूमिकेत अभिनय केला होता. हा चित्रपट इंग्रजीमध्ये 'द टायगर अँड द फ्लेम' म्हणून डब करण्यात आला होता, जो 1956 मध्ये त्याच स्टार कास्टसह प्रदर्शित झाला होता. अगदी अलिकडे झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्यावर कंगना राणावतने 'माणिकर्णिका' चित्रपट बनवला.

स्वातंत्र्य चळवळीतील व्यक्तिमत्त्वांवर बनलेल्या चित्रपटांमध्ये 'गांधी' (1982) हा चित्रपट सर्वाधिक वरचढ ठरला. महात्मा गांधी यांच्या आयुष्यावर आधारलेला रिचर्ड अटनबरो यांनी बेन किंग्जले यांना घेऊन 'गांधी' चित्रपट बनवला होता. या चित्रपटाने जगभर वाहवा मिळवली. मोठे कौतुक झाले.शिवाय त्या वर्षी 11 पैकी तब्बल आठ ऑस्कर पुरस्कार या चित्रपटाने पटकावले.

मनोजकुमार यांच्याप्रमाणे दिग्दर्शक केतन मेहता यांनाही देशभक्तीवरील चित्रपटांचे विशेष आकर्षण आहे. सरदार वल्लभभाई पटेलांचे आयुष्य त्यांनी 1993 मध्ये 'सरदार' चित्रपटाद्वारे प्रेक्षकांसमोर आणले. या चित्रपटामध्ये सरदार पटेलांची व्यक्तिरेखा साकारणाऱ्या अभिनेता परेश रावलचे विशेष कौतुक झाले होते. मेहतांनी कालांतराने आमीर खानला घेऊन 1857 मध्ये ब्रिटिश राजवटीविरुद्ध झालेल्या बंडाचा थरारक इतिहास 'मंगल पांडे - द रायजिंग' या चित्रपटाद्वारे दाखवला होता. स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग असलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यावर दिग्दर्शक श्याम



बेनेगलांनी तयार केलेला "नेताजी - द फरगॉटन हिरो' (2004) हा चित्रपटदेखील उत्तम बनला होता. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या योगदानाची दखलही निर्माते सुधीर फडके यांनी एका मराठी चित्रपटाद्वारे घेतली होती. डॉ. जब्बार पटेल यांनी घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यावर अतिशय सुंदर असा चित्रपट बनवला होता. आपल्या स्वातंत्र्य चळवळीतील विविध घटना या चित्रपटातूनदेखील प्रेक्षकांसमोर आल्या होत्या.

'सरफरोश' (1999) हा एकमेव चित्रपट होता ज्याने आमिरची चॉकलेटी हिरोची प्रतिमा तोडली. यात त्याने एसीपी अजयसिंग राठोडची भूमिका साकारली होती, जो अवैध शस्त्रास्त्रांची तस्करी करणाऱ्या टोळीविरुद्ध लढतो. या चित्रपटात आमिरशिवाय नसीरुद्दीन शाह आणि सोनाली बेंद्रे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका होत्या. जॉन मॅथ्यू दिग्दर्शित 'सरफरोश' हा त्यांचा पहिला चित्रपट होता. एक भारतीय पोलीस अधिकारी दहशतवादाला रोखण्याचा कसा प्रयत्न करतो आणि एकट्याने कसा मुकाबला करतो आणि संपूर्ण व्यवस्थाच बदलून टाकतो असे चित्र त्यात दाखवले होते. हा चित्रपट कारगिल युद्धापूर्वी 30 एप्रिल 1999 रोजी प्रदर्शित झाला होता.अलीकडच्या काळात उरी येथील पाकिस्तानच्या लष्करी तळावर भारताने केलेला हल्लादेखील प्रभावीपणे चित्रपटामधून पाहायला मिळाला होता. भारत-पाकिस्तानमधील 1971 च्या युद्धाची पार्श्वभूमी घेऊन बनविलेल्या 'द गाझी अटॅक' या चित्रपटानेदेखील 18 दिवस समुद्रात चाललेल्या थरारावर प्रकाशझोत टाकला होता.

2001 साली सनी देओलचा 'गदर एक प्रेमकथा', अमीर खानचा 'लगान' प्रदर्शित झाला. 'गदर'मध्ये प्रेम मिळवण्यासाठी पाकिस्तानात जाऊन तिथले सरकार हलवणारा सनी आणि 'लगान' मध्ये आपली जमीन मिळवण्यासाठी इंग्रजांबरोबर आपल्या साथीदारांसह क्रिकेट खेळणारा अमीर लोकांना भावला. दोन्ही चित्रपटातील गाणीही सुपरहिट ठरली. नंतरच्या काळात नवीन तंत्रज्ञान आणि देशभक्तीचा वेगळा दृष्टिकोन ठेवून निर्माता दिग्दर्शकांनी वेगवेगळे चित्रपट बनवले. राकेश ओमप्रकाश मेहरा यांनी 'रंग दे बसंती' आणला. आजच्या पिढीतील सहा युवक कशा पद्धतीने भ्रष्ट व्यवस्थेशी लढा देतात ही शौर्यगाथा दाखवली आहे. ही कथा फुलवताना दिग्दर्शकाने मोठ्या खुबीने चंद्रशेखर आझाद, भगतसिंग यांच्या पात्रांचा उपयोग केला आहे. अशाच प्रकारच्या कमल हसन यांचा 'हिंदुस्थानी' (1996), स्वदेश (2004), तिरंगा, प्रहार, क्रांतीवीर, कोहराम (नाना पाटेकर), जमीन (अजय देवगन), परमाणू, रोमिओ अकबर वॉल्टर (जॉन अब्राहम) हे देशभक्तीपर चित्रपट गाजले.'अ वेन्स्डे' या मध्ये सामान्य माणूस जेव्हा अन्यायाविरुद्ध उभा राहतो तेव्हा संपूर्ण व्यवस्थाच हादरवून टाकण्याची क्षमता ठेवतो हे दाखवून दिलं आहे. 'रोजा', '1942 अ लव्हस्टोरी', 'पुकार', 'लक्ष्य', यांतील शौर्यगाथा रसिकांना आवडल्या. खिलाडी अक्षयकुमार हा अलीकडचा 'भारतकुमार' म्हटला पाहिजे. त्याच्या हॉलिडे, बेबी, नाम शबाना, गब्बर, एअरलिफ़्ट, केसरी, मिशन मंगल, टॉयलेट एक प्रेमकथा, सूर्यवंशी आदी चित्रपटांमधून देशभक्ती डोकावते.

# विनायकराव मेटे : विस्थापितांना प्रतिष्ठा देणारा नेता



वसंत मुंडे
प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र
राज्य पत्रकार संघ, मुंबई

आधुनिक केसरी

**सत्ता कोणत्याही पक्षाची असो मंत्रालयातील विनायकराव मेटे यांचा दबदबा काम घेऊन गेलेल्या अनेकांनी अनुभवला आहे. आपल्याकडे आलेल्या माणसाचे काम मार्गी लावण्याची त्याची मंत्री अथवा अधिकाऱ्यांशी ओळख करुन त्याला प्रतिष्ठा देण्याचा त्यांच्यात मोकळेपणा होता. तीस वर्षाच्या राजकीय आयुष्यात त्यांनी अनेक कार्यकर्ते घडवले, अनेकांना प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यामुळे त्यांचा राज्यभर चाहता वर्ग निर्माण झाला.**

परिस्थितीचे चटके खाऊन तयार झालेल्या नेत्यांना सामान्यांबद्दलची आपुलकी त्यांच्या वागण्या-बोलण्यातून सहजपणे जाणवते. असेच काहीसे विनायक मेटे यांचा संवाद असे. त्यांचा पत्रकार असोत की सर्वसामान्य कार्यकर्ता, नागरिक असो यांच्याशी थेट संपर्क होता. त्यांच्याशी संपर्क झाला नाही असे कधी होत नसे. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्यानंतर राज्यस्तरावरचा हक्काचा नेता म्हणूनच त्यांच्याकडे कार्यकर्ते जात. काम कोणतेही असो, थेट संबंधित मंत्री, सचिव यांच्याकडे घेऊन जाऊन जोरकसपणे शिफारस करण्याचा मोठेपणा त्यांच्यात होता. सत्ता कोणत्याही पक्षाची असो मंत्रालयातील त्यांचा दबदबा काम घेऊन गेलेल्या अनेकांनी अनुभवला आहे. आपल्याकडे आलेल्या माणसाचे काम मार्गी लावण्याची त्याची मंत्री अथवा अधिकाऱ्यांशी ओळख करुन त्याला प्रतिष्ठा देण्याचा त्यांच्यात मोकळेपणा होता. तीस वर्षाच्या राजकीय आयुष्यात त्यांनी अनेक कार्यकर्ते घडवले, अनेकांना प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यामुळे त्यांचा राज्यभर चाहता वर्ग निर्माण झाला. कोणती राजकीय पार्श्वभूमी नसताना विधान परिषदेत तब्बल 26 वर्षापेक्षा अधिक काळ आपले स्थान कायम ठेवण्याची किमया केवळ त्यांच्या राजकीय कौशल्यानेच साधली. मराठवाडा लोकविकास मंचाच्या माध्यमातून विनायक मेटे यांनी मराठवाड्यातील कलावंत, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय पातळीवर काम करणाऱ्या लोकांना विविध पुरस्काराच्या माध्यमातून राज्यस्तरावर प्रतिष्ठा मिळवून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला. तर सतत सामाजिक उपक्रम राबवून लोकांच्या संपर्कात राहण्यासाठी राज्यभर भ्रमण करत. राज्य पातळीवर काम करत असतानाही त्यांचं जिल्ह्यात कायम लक्ष राहिले.

साधारणतः वीस वर्षापूर्वी त्यांच्याशी पत्रकार म्हणून ओळख झाली आणि त्यांनी मैत्रीचे नाते निर्माण केले. विरोधात बातमी आली तरी राग धरला नाही. काही वेळा नाराजी व्यक्त केली पण संवाद कमी होऊ दिला नाही. बीडला आले की, भेटायला बोलावणार. मुंबईत गेले की, वेळ काढून जेवायचा आग्रह करणार. सांगितलेल्या कामाचा पाठपुरावा करुन निरोप देणार. यातुन त्यांनी पत्रकारीतेच्या पलीकडे वैयक्तीक पातळीवर संबंध जोपासले. अनेक पत्रकारांशी अशाच पध्दतीने त्यांचे संबंध राहिले. फोन केला की, नेते बोला? आणि कुठे आहेत? हे त्यांचे ठरलेले वाक्य असे. नंतर मनमोकळेपणाने आणि



बिनधास्त कोणत्याही विषयावर आपली भूमिका स्पष्ट करत. पंधरा वर्षापूर्वी स.मा.गर्गे राज्यस्तरीय पत्रकारीता पुरस्कार वितरणासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याकडे जाण्यासाठी संतोष मानूरकर आणि मी विनायक मेटे यांच्याकडे गेलोत तेंव्हा त्यांनी लगेच थेट विलासराव देशमुखांना फोन करुन भेट घडवून आणली. आपल्या जिल्ह्यातील पत्रकार राज्यस्तरावरचा कार्यक्रम घेत आहेत याचे त्यांना कौतुक असे. काही वर्षापूर्वी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर मुंबईच्या कार्यालयात त्यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या आणि काही काम पडले तरी हक्काने सांगा असे सांगितले. राज्यस्तरावरच्या अनेक पत्रकार, संपादकांच्या ओळखीही त्यांनी करुन दिल्या. पत्रकार संघाच्या कुठल्याही कार्यक्रमाला निरोप मिळाले की ते हजेरी लावत. राजकीय भूमिकेच्या पुढे जाऊन त्यांनी मैत्री आणि संवाद जोपासला. सामान्य परिस्थितीतील माणसांना ते कोणत्याही क्षेत्रातील असोत त्यांना प्रतिष्ठा देण्याचा, पुढे जाण्यासाठी आत्मविश्वास वाढवण्याचा सातत्याने त्यांनी प्रयत्न केला. असं नेतृत्व उमेदीच्या टप्प्यावर असताना अचानक पणे निघून गेले. गोपीनाथ मुंडे नंतर विनायक मेटे यांच अपघाती निधनाने नियतीची कुर्रताच दिसून आली.

# कृतीशील समाजसुधारक राष्ट्रसंत भगवानबाबा...!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी


**"तैसा व्यासाचा मागोवा घेतु" या संत ज्ञानेशांच्या प्रेमानुभूतीनुसार जेष्ठ-श्रेष्ठांचा मागोवा घेऊनच जीवनाची खडतर वाट सुकर करण्याचा प्रयत्न होणे अपेक्षित आहे. आधुनिक काळात अनेक सामान्यांतील सामान्य माणसांनीच असामान्य इतिहास घडवला आहे ! आजमितीला कुणीही कुणाला तुच्छ लेखू नये अथवा आत्मक्लेश करून घेऊ नये. माऊली ज्ञानेश्वरीमध्ये,**

**दिवटीच्या आंगीं थोरी | तरी ते बहु तेज धरी |**
**वाती आपुलिया परी | आणीच कीं ना ? ॥**

ह्या ओव्यांच्या द्वारे दिवटी असो की वात, आपापल्या परीने प्रकाश देण्याचे कार्य करत असते असा उपदेश करतात. याच न्यायाने महाराष्ट्राच्या दुर्गम, मागास आणि उसतोड कामगारांच्या बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यात सामान्य कुटुंबात कृतीशील समाजसुधारक राष्ट्रसंत भगवानबाबांचा जन्म झाला. बीड जिल्ह्यातील डोंगरमाथ्यावरील विविध नद्यांच्या उगम-संगमावरील सुप्पे सावरगावात श्रावण वद्य पंचमी, शके 1818 (29 जुलै, 1996) सोमवार रोजी सूर्योदय समयाला सौ.कौतीकाबाई तुबाजी सानप (पाटील) यांच्या पोटी आबाजी नावाचे रत्न जन्मले. आबाजींचे बालपण कडक शिस्त आणि संस्कारात गेले. एकीकडे आईचे रामायण-महाभारताचे भक्तिभावाने श्रवण, गावातील नित्य भजन-कीर्तन याचे संस्कार बाल आबाजींवर झाले, तर दुसरीकडे वडील तुबाजी पाटील हे गावची पाटीलकी सांभाळतांना आपल्या मुलाबाळांवर शिस्त, व्यायाम, जिद्द आणि कष्ट करण्याचे संस्कार रुजवले. 'येथं वडील जे जे करिती तया नाम धर्म म्हणीती' या न्यायाने आपल्या घरातच आबाजींना आई-वडील आणि अन्य मंडळींकडून सुसंस्कार आणि शिस्तीचे बाळकडू मिळाले.

घरातील सर्व नियमित संस्कार-सोपस्कार चालले असतांना विद्यार्थी दशेतील बाल आबाजी मात्र थोडा एकटा आणि आपल्याच विचारात मग्न असायचा. कधी-कधी एकटाच शून्यात दृष्टी ठेवून तासंतास एकाच जागी बसायचा ! अक्षरशः आई कौतीकाबाई त्याला हलवून भानावर आणायच्या ! घरातील सर्वांनाच आबाजीचं हे वर्तन थोडं विचित्रच वाटायचं ! तर दुसरीकडे अभ्यासु वृत्ती, आज्ञाधारकता, वळणदार अक्षर, रुबाबदार बोलणे, शांत-संयमी स्वभाव यामुळे शाळेत आबाजी शिक्षकांचा आणि गावात सवंगड्यांचा जिवलग झाला. आबाजी मात्र आपल्या मित्रांसोबत सामान्य खेळ न खेळता मुलांना आपल्या भोवताल बसवून भजन म्हणायचा, पोथी वाचायचा ! एका दिवशी तर बाल आबाजीने पोरा-बाळांना गोळा करून अक्षरशः कीर्तनच केले ! असां हा बालपणीचा काळ भुर्रकन उडून गेला आणि गावातील दुसरीपर्यंतची शाळा संपल्यावर आबाजींना पुढील शिक्षणासाठी मामाच्या गावी लोणीला जावे लागले.

बालवयातील संस्कारांनी समृद्ध झालेले आबाजी हे अगदी कमी वयात समाजसुधारणेचा विचार करू लागले. मामाच्या गावी शिक्षण घेऊन दोन वर्षांनी आबाजी पुन्हा आपल्या गावी परतले. सावरगाव घाट परिसरातील डोंगरमाथ्यावर गाई सांभाळण्याचे सोपे काम आबाजीने स्वीकारले. सावरगावात गीतेबाबा दिघुळकर यांच्या दिंडी मुक्कामास गीतेबाबांचे सुंदर कीर्तन झाले आणि सकाळी आबाजी घरी कुणालाही न सांगता गीतेबाबांच्या दिंडीत पंढरपूरला निघून गेले. त्यानंतर एकावर एक महत्वपूर्ण घटना घडल्या. आबाजी पंढरपूर वारीवरून परतल्यानंतर मंदिरावरच थांबले. 'घरी सर्वजण जर माळकरी होत असतील तरच मी घरी येईन अशी आट घातली आणि




मुलाच्या हट्टापायी पाटलांनी तुळसी माळ घालून मांसाहार वर्ज्य करण्याचे अभिवचन दिले. समाज सुधारणेची मुहूर्तमेढ घरीच रोवली आणि भक्ती-ज्ञान क्षेत्रांत एक क्रांतिकारी पाऊल टाकले !

आता मात्र आबाजींचे घरातील कोणत्याच कामात मन लागेनासे झाले, परिणामी त्यांनी नारायण गडावर माणिक बाबांच्या मार्गदर्शनात अभ्यास करायचे ठरवले. तिथे माणिक बाबांच्या सानिध्यात वारकरी, अध्यात्म आणि ज्ञानाचे संस्कार करून माणिक बाबांनी त्यांना आबाजी नाव बदलून भगवान हे नाव प्रदान केले. तेंव्हापासून आबाजी भगवान बाबा म्हणून ओळखले जाऊ लागेल. त्यानंतर गावोगावी लोक बाबांना कीर्तनांसाठी बोलावू लागले. बलदंड देहयष्टी, नैष्टिक ब्रह्मचर्य, खडा आवाज, सुमधुर गायन आणि सखोल ज्ञान भगवान बाबांच्या कीर्तनातून पाझरू लागले ! पाहता पाहता बाबा परिसरात प्रसिद्ध झाले. याचा उलट परिणाम झाला. बाबांचे हितशत्रू वाढले आणि बाबांवर परस्त्रीचा आळ आणला गेला ! ही बातमी बाबांना समजताच बाबांनी नारायण गडाच्या पायथ्यासी धारदार विळ्याने स्वतःचे लिंग कापून टाकले. पायथ्यासी बाबा बेहोश पाहून काही शिष्यांनी त्यांना तात्काळ दवाखाण्यात उपचारार्थ दाखल केले. प्रकृती सुधारल्यानंतर बाबांनी नारायण गड सोडायचा निर्णय घेतला आणि ते धुम्यागडावर म्हणजेच आताच्या भगवानगडावर येऊन आपले कार्य सुरु केले.

भगवानबाबांनी नैष्टिक ब्रह्मचर्य स्वीकारून कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून समाजोत्थान आणि प्रबोधनाचे वृत्त धारण केले होते. बाबा गावोगाव जाऊन गोर-गरीब-वंचित-उपेक्षित-अज्ञानी लोकांचे प्रबोधन करू लागले. उच्च-नीचता संपवा, जातीभेद थांबवा, सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करा असा उपदेश करत. अनेक कृतीशिल कार्यक्रमातून त्यांनी समाजसुधारणा कार्याची चुणूक समाजाला दाखवून दिली. बाबांची आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची हैद्राबाद येथे भेट झाली होती. त्या भेटीत डॉ.आंबेडकरांनी बाबांसोबत डोंगरदऱ्यांतील लोकांमध्ये शिक्षण प्रसाराचे कार्य करण्याची आवश्यकता बोलून दाखवली. बाबांनाही शिक्षणाचे महत्व ठाऊक असल्याकारणाने पंचक्रोशीतील लोकांकडून वर्गणी, धान्य गोळा करून, डोक्यावर दगड जमा करून धौम्य गडाच्या पायथ्यासी शाळा बांधली. परिसरातील गोर-गरीब, कामगारांच्या मुलांना मोफत शिक्षण देणे सुरु केले. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर आणि संतांच्या उपदेशाची जाण बाबांना असल्यामुळे ते कीर्तनातून "एक एक्कर जमिन विका पण मुले शिकवा" असा उपदेश करायचे.

याशिवाय अनेक गावातील कालबाह्य झालेल्या रूढी परंपरांच्या विरोधात कृतीशील कार्य केले. डोंगर-दऱ्यातील समाज दारू, तंबाखू, बांधावरून भांडणे यापासून दूर कसा राहील (?) यासाठी बाबा कीर्तनातून उपदेश करायचे. बाबांनी भगवानगड आणि पंचक्रोशीत गावोगाव नारळी साप्ताह सुरु केले. 'जेथे करावे कीर्तन | तेथे सेवू नये अन्न ॥' या तुकोक्तीप्रमाणे ते फक्त नारळ घेऊन लोकांना निर्व्यसनी रहा, आई-वडिलांची सेवा करा, शिक्षण शिका असा सरळ साधा उपदेश करायचे. बाबांनी परिसरातील अनेक गावच्या जत्रेतील गोहत्या, प्राणीहत्या सारख्या अमानुष रूढी परंपरा बंद केल्या. प्रसंगी बळी जाणाऱ्या गायीच्या गळ्याला चिकटून राहिले परंतु गोहत्या होऊ दिली नाही !

आज श्री संत भगवान बाबांच्या जयंतीनिमित्ताने विचार करतांना अनेक गोष्टींचा उल्लेख होणे अपेक्षित आहे. समाज व्यसनाधीन होत असून जातिवाद वाढतो आहे. धर्मसहिष्णुता ढासळत आहे. तेंव्हा, सर्वच कट्टरता सौम्य होऊन 'वसुधैव कुटुंबकम' भावना वृद्धिंगत होणे गरजेचे आहे. तसेच वर्तमानात कीर्तन-प्रवचन करणाऱ्या धुरिणांनी संत वचनांचा केवळ व्यापार न करता आपणही या समाजाचे काहीतरी देणे लागतो हे लक्षात ठेवावे ! प्रबोधन करतांना केवळ विनोद आणि पैशावर लक्ष केंद्रित झाल्यामुळे लोक 'कीर्तन केवळ धंदा झाला आहे !' असे हिणवत आहेत. हे कुठेतरी थांबून आपण सर्वांनीच समाजऋण फेडण्यासाठी आग्रही रहावे. असे झाल्यास कृतीशील समाजसुधारक संत श्री भगवान बाबांचे आपण पायिक म्हणवून घेण्याच्या योग्यतेचे होऊ, अन्यथा सर्व केवळ देखावाच ! रामकृष्णहरी ! जय भगवान बाबा !

**(टीप : लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त रा.स्व. संघातर्फे पुण्यात विविध ठिकाणी ध्वजवंदन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पश्चिम महाराष्ट्र प्रांत आणि भारतीय संस्कृती संवर्धक संस्था यांच्या वतीने मोतीबाग येथे प्रसिद्ध व्यापारी अरविंद बुधानी यांच्या हस्ते ध्वजवंदन आणि भारतमाता पूजन करण्यात आले. यावेळी कसबा भाग संघचालक प्रशांत यादव आणि संस्थेचे विश्वस्त बाजीराव तथा आप्पा मणेरे व्यासपीठावर उपस्थित होते.

बुधानी म्हणाले की, भारतात जन्म झाल्याने आपण खरोखर भाग्यवान आहोत. सचोटी, प्रामाणिक कष्टाने, आई-वडील तसेच सद्गुरूंच्या आशीर्वादाने मिळालेले यशच शाश्वत असते. यावेळी सांस्कृतिक वार्तपत्राच्या फाळणीच्या वेदना या विशेषांकाचे प्रकाशन झाले. राजेंद्र वाल्हेकर यांनी प्रास्ताविक केले. दरम्यान पुणे महानगरात विविध ठिकाणी ध्वजवंदन करण्यात आले.

कोथरूड परिसरात ध्वजवंदन बारा बलुतेदार संघाचे अध्यक्ष रामदास सुर्यवंशी यांच्या हस्ते कोथरूड परिसरात ध्वजवंदन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून रा.स्व. संघाचे पुणे महानगर प्रचार प्रमुख सुनील खेडकर उपस्थित होते. त्यांनी स्वातंत्र्य संग्रामातील संघाचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले. समाजाला प्रगल्भ करण्याचे रचनात्मक काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघ निष्ठेने करतो आहे. राष्ट्र उभारणीचे प्रचंड कार्य उभे करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने समाजाला नेहमी वैचारिकदृष्ट्या सक्षम व सांस्कृतिकदृष्ट्या प्रगल्भ करण्याचे मोठे रचनात्मक कार्य केले असून समाजाची सेवा करण्याचा संस्कार संघ आपल्या स्वयंसेवकांना देतो आहे. या शब्दात बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष रामदास सूर्यवंशी यांनी संघकार्याचा गौरव केला. 'हर घर तिरंगा' अभियानामुळे राष्ट्रभक्तीची भावना वाढली असल्याचे सांगून ही भावना इथून पुढेही सर्वांनी सतत आपल्या मनात बाळगावी, असे आवाहन सूर्यवंशी यांनी केले. यावेळी संभाजीभाग संघचालक अनिल व्यास, कार्यवाह सुधीर जवळेकर उपस्थित होते.

**स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठान**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठानतर्फे वीर बाजी पासलकर स्मारक येथे नेत्रविकार तज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद शिरुले यांच्या हस्ते ध्वजवंदन आणि भारतमाता प्रतिमा पूजन करण्यात आले. रवींद्र शिंगणापूरकर यांनी प्रास्ताविक केले.

**संस्कार भारतीतर्फे वंदे मातरम् गायन**

कर्वे स्त्री शिक्षण संस्था, समर्थ योग अक्कलकोट स्वामी मंदिर (धायरी), राजयोग अपार्टमेंट (धायरी), पर्पल कॅसल (बिबवेवाडी), पानमळा, सुयश अपार्टमेंट (धायरी), मधूकोश सोसायटी, सायली शेल्टर्स-कर्वेनगर, श्री. स्वामी समर्थ महाराज मठ, श्री. महावतार बाबाजी मठ (नांदेड सिटी), राजेंद्र नगर वेदांत सांस्कृतिक मंच-कर्वेनगर, क्रांतिस्तंभ, महाराष्ट्र मिलिटरी फाऊंडेशन (आझाद हिंद सेना), एम.ई.एस. कॉलेज ऑफ अपार्टमेंट आर्ट्स, राष्ट्रसेविका समिती (लेकटाऊन), नवनीत मित्रमंडळ (सदाशिव पेठ), पश्चिम प्रांत कार्यालय (कोथरूड), तपोधाम (वारजे), दत्त दिगंबर सोसायटी (वारजे), ज्ञानदा प्रशाला (कर्वेनगर), ताथवडे उद्यान गोल्डन पेटल्स सोसायटी आदी ठिकाणी हा उपक्रम पार पडला.

**रा.स्व. संघ वडगावशेरी कार्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजवंदन**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, वडगावशेरी भाग कार्यालयात भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तिरंगा ध्वज फडकविण्यात आला. माजी सनदी अधिकारी मोहनजी अडतानी यांच्या हस्ते भारतमाता पूजन आणि ध्वजवंदन करण्यात आले. कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वडगावशेरी भाग संघचालक मल्हारी चांधरे आणि स्वयंसेवक उपस्थित होते.





## 75 वा स्वातंत्र्य दिन व अमृतमहोत्सवी वर्ष ठिकठिकाणी साजरे

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** आज ७५ वा स्वातंत्र्य दिन व अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त बिडकिन येथील पोलिस ठाणे, ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामीण रुग्णालय बिडकिन, तसेच शाळा, विद्यालये व महाविद्यालये येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. तसेच शाळा व महाविद्यालये यांच्या वतीने भव्य दिव्य प्रभात फेरी चे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी भारत माता की जय, हर घर तिरंगा, वंदे मातरम् या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. बिडकिन येथील सर्व खाजगी व सरकारी कार्यालये येथे स्वातंत्र्य दिन व अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्य सैनिक रंगनाथ हिवाळे, सहायक पोलिस निरीक्षक संतोष माने, वैद्यकीय अधीक्षक डॉ. दळवी, सहायक वैद्यकीय अधीक्षक बनकर, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, किसन तोतला, ग्रामसेवक अरुण गोर्डे, माजी सरपंच अशोक धर्मे, शिवसेना तालुकाप्रमुख मनोज पेरे, वामन साठे, नगरसेवक विकास गोर्डे, अमोल वंजारे, किरण गुजर, उत्तम धर्मे, सागर तोतला, सागर फरताळे, मधुकर सोकटकर, तमीजोद्दीन इनामदार, राजु पिंजारी, फिरोज सय्यद, असलम सय्यद, समद अत्तार, अख्तर पठाण, मौलाना वसीम, मौलाना निजाम, मौलाना अशपाक, मुख्याध्यापक दानेकर, काकासाहेब टेके, नन्हेखा पठाण, मुख्याध्यापक मनोहर चित्तोडकर, उपमुख्याध्यापक राजेंद्र कोठावदे, पत्रकार नंदकुमार वैद्य, हसन चाऊस, अशोक शेळके, मधुकर सोकटकर आदींसह बिडकिन व परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. तसेच आजी माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलिस अधिकारी व कर्मचारी, वैद्यकीय अधीक्षक व अधिकारी, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि कर्मचारी यांची व बिडकिन व परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## औराळा येथे वीर जवानांच्या माता-पित्यांचा व माजी सैनिकांचा सत्कार सोहळा व सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा येथील वि.का.सेवा सह. संस्था व झुआरी अँग्रो कंपनी औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने व स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशासाठी शहीद झालेल्या वीर जवानांच्या माता-पित्यांचा व माजी सैनिकांचा यथोचित असा नागरी सत्कार सोहळा व सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कृषीभूषण भाऊसाहेब थोरात बोलताना म्हणाले की, एक जवान देशासाठी दिवस-रात्र सीमेवर पहारा देऊन संरक्षण करतात व दुसरा जवान हा देशासाठी शेतीमध्ये धान्य पिकवतो आपल्या देशासाठी हे दोन्ही जवान दिवस रात्र परिश्रम घेतात देशावर कितीही मोठा संकटाला तरी आपला जवान सीमेवर राहून देशाचे संरक्षण करतो असे आपले मनोगत व्यक्त केले आणि या कार्यक्रमासाठी वि.का. संस्थेचे चेअरमन मुन्ना शेठ व झुआरी कंपनीचे विभागीय व्यवस्थापक व यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी सरपंच सोनाली सुरेश बागुल ग्रामसेवक सुजाता गवई विकास सोसायटीचे चेअरमन मुन्ना खंडेलवाल आर.बी. संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब पा. थोरात व सर्व सदस्य, जिल्हा म.सह. बँक औराळाचे इन्स्पेक्टर एम.जी.चोभे, मॅनेजर आर.पी. हिरे, कर्मचारी, गटसचिव अण्णासाहेब शिंदे, ग्रामपंचायत सदस्य दिशांत जिवरख, राजेंद्र भारतीय, तात्याभाऊ जिवरख, रामहरी भवर, एकनाथ पवार, भालचंद वाघ व परिसरातील सर्व शेतकरी गावातील प्रतिष्ठीत वर्ग हजर होते.




## डॉ. पांडवे यांचा कोरोना योद्धा म्हणून सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त जिल्हा परिषद औरंगाबाद, पंचायत समिती खुलताबाद व सुलीभंजन ग्रामपंचायतचे वतीने कोरोना काळात खुलताबाद तालुक्यातील वेरूळ प्राथमिक आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.बलराज पांडवे यांनी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सुलीभंजन ग्रामपंचायतचे वतीने कोरोना योद्धा म्हणून सत्कार करण्यात आला. यावेळी शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

१५ ऑगस्ट रोजी आजादीका अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात सरपंच सय्यद इलियास सय्यद युनुस, उपसरपंच संतोष बोडखे, ग्रामविकास अधिकारी इंगोले यांचे हस्ते सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. बलराज पांडवे यांना कोरोना काळामध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्याबाबत "कोरोना योद्धा" म्हणून सन्मानित करण्यात आले. यावेळी सुलीभंजन, नंद्राबाद ग्रामपंचायत सदस्य, वेरूळ प्रा.आ. केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ.महेश चोपडे, डॉ. माळी, शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्ती, आरोग्य कर्मचारी एस.पी.वाघ, सुधाकर बोडखे, आशा सोनवणे आरोग्य सेविका, आशा गटप्रवर्तक, आशा (सर्व) व ग्रामस्थ उपस्थित होते.

## विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर थोरे यांचा निरोप समारंभ

आधुनिक केसरी न्यूज



**बिडकीन :** आज दि.१५ ऑगस्ट रोजी पैठण येथे कार्यरत असलेले विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर थोरे यांचा बिडकिन ग्रामपंचायत कार्यालय येथे निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. बिडकिन ग्रामपंचायत कार्यालय येथे १९९३ साली ते ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत होते. कार्यरत असताना ग्रामपंचायत कार्यालयची इमारत, मंगल कार्यालय, गाळे आदींसह भरपुर कामे त्यांनी आपल्या कार्यकाळात केली. ग्रामपंचायत कार्यालय येथे विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर थोरे यांना निरोप समारंभाचे आयोजन करत निरोप देत सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख मनोज पेरे, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष किसन तोतला, ग्रामसेवक अरुण गोर्डे, माजी सरपंच अशोक धर्मे, युवासेना तालुकाप्रमुख विकास गोर्डे, अमोल वंजारे, किरण गुजर, पत्रकार हसन चाऊस, नंदु वैद्य, उत्तम धर्मे, आदींसह ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व अधिकारी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## शीतला माता मंदिर समितीतर्फे ध्वजारोहण साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**अजिंठा :** येथील तेलीपुरा गल्लीतील शितला माता मंदिर व्यवस्थापन समितीतर्फे मंदिरावरील कळसावर भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आज ध्वजारोहण करण्यात आले. सकाळपासूनच मंदिरावर देशभक्तीपर गीते वाजवण्यात आली. सकाळी 8:00 वाजता ध्वजपूजन करून कळसावर ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजवंदन करून राष्ट्रगीत म्हणण्यात आले. यावेळी असंख्य नागरिक उपस्थित होते. समितीतर्फे नागरिकांना फराळ वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कोणत्याही धर्मापेक्षा राष्ट्र सर्वात मोठे आहे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. व सोबतच भारत माता की जय, वंदे मातरम, स्वातंत्र्य दिनाचा विजय असो अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी शितला माता मंदिर व्यवस्थापन समितीच्या सर्व पदाधिकारी सहित तेलीपुरा गल्लीतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

# ॲॅम्ब्युलन्स हेल्प रायडर्स औरंगाबाद आयोजित 'शूरा तुला वंदितो'

## अमृत महोत्सव स्वातंत्र्याचा, सन्मान रुग्णवाहिका चालकांचा

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** ॲम्ब्युलन्स हेल्प रायडर्स औरंगाबाद या सामाजिक कार्यात विशेष करून अपघात वेळी मदतीला कायम अग्रेसर असणाऱ्या व नवनवीन लोकोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या संस्थेने स्वतंत्र भारताचा अमृत महोत्सव १५ ऑगस्ट क्रांती चौक येथे आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. याकरिता भव्य व नेत्रदीपक असे मंच उभारण्यात आले होते. डीजे वर देशभक्ती पर गीतांनी अवघा परिसर देशाच्या महोत्सवात तल्लीन झाला होता आणि प्रचंड मोठया प्रमाणात अबाल वृद्ध सर्वजण उत्साहात नृत्य करताना दिसून येत होते. शहरातील सुप्रसिद्ध वाद्यवृंद पथक नवयुवक मंडळ आणि महाकाल प्रतिष्ठान यांनी यावेळी तालबद्ध सादरीकरण केले.

या प्रसंगी अपघात समयी रात्री अपरात्री निःस्वार्थ पणे सेवा देणाऱ्या ७५ ॲम्ब्युलन्स चालकांचा शुरा तुला वंदितो म्हणत सन्मान करण्यात आला. यात शहरातील ७५ ऍम्ब्युलन्स चालक यांना सन्मान-पत्र व पुष्प देऊन गौरवण्यात आले. प्रातिनिधिक स्वरूपात ०५ रुग्णवाहिका चालक यांना औरंगाबाद पश्चिमचे आमदार संजय शिरसाठ यांच्या हस्ते गौरवण्यात आले तसेच नगरसेवक सिद्धांत शिरसाठ, राजेंद्र जंजाळ, भावेश सराफ, अभिजित भैय्या देशमुख, ऋषिकेश जैस्वाल, ज्ञानेश्वर शेळके, सचिन निकम, गुणरत्न सोनावणे, रमेश बाहुले अश्या अनेक मान्यवरांनी हजेरी लावली होती. शहरात उत्कृष्ट सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था म्हणजे औरंगाबाद म्युझिक असोसिएशन, औरंगाबाद प्लॉगर्स फौंडेशन, रॉबिनहुड आर्मी, मी पण सावरकर संघटणा यांचा देखील विशेष कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.

तरुणाईचे आकर्षण आणि ॲम्ब्युलन्स चालकांचा सन्मान असे दुहेरी सूत्र कार्यक्रमात पहायला मिळाले. झुंबा फिटनेस डान्सर चेतन पाटील, सिमो डान्स अकादमीचे राहुल भालेराव व RJ ऋतुराज ढापरे यांनी उपस्थित तरुणाईला फिटनेस करिता विशिष्ट संगीताच्या तालावर बेभान नाचवले तसेच असावा ब्रदर्सच्या ७५ मुला मुलींच्या ग्रुपने अर्धातास देशभक्तीपर गीतांवर नेत्रदीपक असे नृत्य सादरीकरण केले. चार तास चाललेल्या या ॲम्ब्युलन्स हेल्प रायडर्स आयोजित भारतीय स्वातंत्र्यच्या अमृतमहोत्सवी रंगतदार सोहळ्याची शहरभर चर्चा होती.

**हेल्प रायडर्सचे सेल्फी पॉईंट व चार्ली चॅप्लिन ठरले खास आकर्षण...**

याच प्रसंगी ॲम्ब्युलन्स हेल्प रायडर्स संस्थेने भारताच्या नकाशाच्या कटाऊट पद्धतीचा एक आगळा वेगळा सेल्फी पॉईंट तयार केला होता. ज्यावर औरंगाबाद करांनी सेल्फी काढण्यासाठी झुंबड केली होती. या सेल्फी पॉईंटवर सर्वच स्तरातील नागरिकांनी आवडीने छायाचित्रण केल्याचे या कार्यक्रमाचे प्रकल्प प्रमुख विनोदअप्पा रुकर यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲम्ब्युलन्स हेल्प रायडर्सचे मुख्य समन्वयक संदीप कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन भूषण कोळी यांनी केले. भव्यदिव्य असा अमृत महोत्सवी उपक्रम यशस्वी करण्यासाठी मनोज जोशी, जगदीश एरंडे, ॲड.श्रीकांत मिश्रा, अभिषेक कादी, रितेश जैन, सुधीर व्यास, किशोर अग्रवाल, कल्पेश काथार, मुकेश गाडेकर, कृष्णा निंभोरकर, किरण शर्मा, स्नेहा पारिक, स्मिता नगरकर, स्मिता जोशी, मीना घुंबरे, गोविंद कुलकर्णी, नारायण पांडव, सुरेश हिंगमिरे, पराग लीगदे, मोहनिष अष्टपुत्रे, ज्ञानेश्वर डोळे, स्वप्नील चंदणे यांसह इतर अनेक हेल्प रायडर्स परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. चार्ली चॅप्लिन यांनी अँब्युलन्स हेल्प रायडर्स मधील सदस्यांच्या सहकार्याने अपघात ग्रस्तांना कधी मदत केली जाते याचे प्रात्यक्षिक सुद्धा नागरिकांना यावेळी दाखवले. सदरील कार्यक्रमाचा आनंद औरंगाबाद मधील असंख्य तरुणांनी व तरुणींनी घेतला.

## आजपासून संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सवाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** श्री क्षेत्र आपेगाव ता. पैठण येथे बुधवार आजपासून ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्मोत्सवला प्रारंभ होत आहे. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज यांनी दिली. या सप्ताहभर चालणाऱ्या सोहळ्यात कलश पुजन, काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, बाळक्रिडा गाथा, भजन, हरिपाठ व दररोज एक याप्रमाणे ख्यातनाम किर्तनकाराचे किर्तन होणार आहे.

याशिवाय बुधवारी १९ सकाळी आकराला गावातून मिरवणूक काढण्यात येईल व रात्री सर्व ग्रामस्थाच्या उपस्थितीत माऊलीचा महाभिषेक पुष्पवृष्टी तसेच ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर संस्थानचे अध्यक्ष यांचे किर्तन होईल व गोपाळ काल्याच्या दिवशी बालवारकरी व गावातील तरुण मंडळीच्या हस्ते दहीहंडीचा कार्यक्रम होणार व दि.२४ ऑगष्ट रोजी महाप्रसादाचा कार्यक्रम होवून सागंता होईल. या सप्ताह काळात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून जन्मोत्सव सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर संस्थान व ग्रामस्थांनी केले.



## पैठणच्या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे स्वातंत्र्य दिनी वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या मुख्य पैठण कार्यालयाच्या भव्य प्रांगणात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे ध्वजारोहण सहाय्यक अभियंता ( श्रेणी १ ) राजेंद्र बोरकर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावर्षीचा हा सोहळा भव्य दिव्य आणि नजरेत भरणारा ठरला. पाच वर्षांपूर्वी अक्षरशः ओसाड व बेवारस अवस्थेतून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या परिसराचे तत्कालीन उप अभियंता बोरकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नवनवीन कल्पकता व पद्धतीचा अवलंब करून पाच वर्षांच्या कालावधीत रुपडे पालटुन टाकले आहे. पैठण-आपेगाव तिर्थक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून झालेल्या सर्वच कामांचा दर्जा बोरकर यांच्या कार्यकाळात लक्षणिय सुधारल्याचे चित्र ठळकपणे पहायला मिळाले आहे. उल्लेखनीय म्हणजे दुरुस्ती व देखभाल अभावी नामशेष झालेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागांवरच अत्यंत देखणी, सुसज्ज इमारत उभी राहिली ती केवळ वर्षभरात. यासाठी बोरकर यांच्याकडून कागदोपत्री ते ऑन दी स्पॉट काटेकोर नियोजन, हाताळणीची अंमलबजावणी महत्वाची ठरली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा हा संपूर्ण परिसरच मोठ्या प्रमाणात विकसित झालेला पहायला मिळत आहे आता. यासाठी पैठणचे आमदार व राज्याचे रोहयो व फलोत्पादन मंत्री संदिपान पा भुमरे यांनी भरघोस निधी उपलब्ध करुन देतानाच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. उपयुक्त सूचना दिल्या.

**लवकरच उठणार स्थगिती ?**

राज्यातील सत्तांतरानंतर अनेक योजना, विकास कामांना स्थगिती देण्यात आली. यामध्ये पैठण तालुक्यातील जवळपास दिडशे कोटी रुपये खर्चाच्या कामांचा समावेश आहे. ही स्थगिती उठवण्यासाठी ना. भुमरे यांचे शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. सहाय्यक अभियंता बोरकर यांनी ही स्थगिती लवकरच उठु शकते असे सांगितले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये औपचारिकपणे दैनंदिन कामकाज सुरू करण्यात आले आहेत. यावेळी सर्व कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. सध्या मोकळ्या जागेत निसर्गरम्यता आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले आहेत.





## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळातर्फे महारक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळ औरंगाबाद आणी ब्राम्हण बिझीनेस मंच (BBM) आयोजीत स्व. शंतनु चौधरी सरांच्या प्रेरणेतुन घेण्यात आलेल्या स्वतंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्ष दिना निमित्त ५ वे भव्य महारक्तदान शिबिर पार पडले.

या शिबिराला समाज बांधवांनी आणी ब्राम्हण बिझिनेस मंचच्या व्यवसायिक बंधू भगिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तसेच एनसीसीच्या जुन्या विद्यार्थ्यांनी शिबिराला भेट देऊन रक्तदान केले. या शिबिराला यशस्वी करण्यात मंडळाचे पदाधिकारी नरेश जोशी, अंबादास कुलकर्णी, पद्माकर कोटचिरकर, वैभव देशपांडे, रवी जेउरकर, डॉ.अमोल पांडव, रमेश एकबोटे तसेच महिला पदाधिकारी, मोनिका शंतनु चौधरी, संध्या मुगुटे, उत्कर्षा पारनेरकर, मयुरी दाभाडकर, कल्पना जोशी, कल्पना कुलकर्णी आणि रक्तदान शिबिराचे प्रकल्प प्रमुख म्हणून श्रीपाद मुगुटे, प्रशांत दाभाडकर, अनंत कुलकर्णी यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाची शोभा मानसी दाभाडकर यांच्या अप्रतिम रांगोळीने वाढली. अश्या सुंदर वातवरणात रक्तदान शिबिरचा कार्यक्रम खुप छान पार पडला.

## आश्रम शाळा घाणेगाव तांडा येथे भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७५ वा वर्धापन दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७५ वा वर्धापन दिन सोयगाव तालुक्यातील घाणेगाव तांडा येथील आश्रम शाळेच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. सदर कार्यक्रम हा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

स्वातंत्र्य दिनी covid -1 9 च्या काळात सोशल डिस्टनचे पालन करून राष्ट्रीय झेंड्याला सलामी देताना उपस्थित असलेले ग्रामपंचायत सरपंच रत्नाबाई सुरेश चव्हाण, मुख्यधापक आर.बी. चव्हाण, सुरेश चव्हाण, लवांडे, भागवत चव्हाण, घाणेगाव तांडा ग्रामपंचायत ग्रामसेवक एस.ए. रणशिंग, अंगणवाडी सेविका, मदनिस यांच्या उपस्थितीत निबंध स्पर्धा, देश भक्तीपर गीतगायन स्पर्धा घाणेगाव तांडा येथे भारतीय स्वातंत्र्याचा ७५ वा वर्धापन दिनी ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.




आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# डॉ. दिलीप म्हैसेकर हाजीर हो !

## संचालक-वैद्यकीय शिक्षण यांना न्यायाधिकरणाच्या अवमानप्रकरणी नोटीस

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** न्यायाधिकरणास दिलेला शब्द न पाळल्याबद्दल महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या औरंगाबाद खंडपीठाने संचालक - वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय दिलीप गोविंदराव म्हैसेकर यांना अवमानप्रकरणी नोटीस काढली आहे. न्या. पुखराज बोरा व न्या. बिजयकुमार यांनी सदर आदेश दिला. शासनाने अनुमती देऊनही अधिपरिचारकांची रिक्त पदे भरण्यास म्हैसेकर यांनी टाळाटाळ केल्याबाबत सदर कारवाई करण्यात येत असल्याचे न्यायाधिकरणाने आपल्या आदेशात म्हटले आहे. म्हैसेकर यांनी समाधानकारक उत्तर न दिल्यास त्यांचेविरूध्द तुरूंगवास अथवा आर्थिक दंड अशी कारवाई होऊ शकते.

याबाबत हकीगत अशी की, वर्ष 2018 मध्ये वैदयकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या वतीने अधिपरिचारीकांच्या एकूण 529 पदांच्या भरतीची जाहिरात प्रकाशित करण्यात आली. जाहिरातीनुसार भरतीपरीक्षा पार पडली व अंशकालीन कर्मचारी व माजी सैनिक प्रवर्गातील आरक्षित पदे वगळता अन्य सर्व पदांसाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात आली. उपरोक्त दोन्ही प्रवर्गातून पात्र उमेदवारांचे अर्ज प्राप्त न झाल्याने सदर पदे रिक्त राहिली. त्यामुळे अंशकालीन कर्मचारी व माजी सैनिक प्रवर्गातील रिक्त पदे परावर्तित करुन सर्वसाधारण कोट्यातून भरण्याबाबत परवानगी मिळणेकरीता संचालक-वैद्यकीय शिक्षण यांनी शासनाकडे विनंती केली. तथापि, संचालक यांच्या पत्रावर शासनाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे पाहून परिक्षार्थी रत्नहारी बडे व इतर उमेदवार यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारणाकडे मूळ अर्ज दाखल करून दाद मागितली. सुनावणी दरम्यान सादरकर्ता अधिकारी यांच्या वतीने न्यायाधिकारणासमक्ष एक पत्र सादर करण्यात आले. अंशकालीन व माजी सैनिक प्रवर्गातील पदे सर्वसाधारण प्रवर्गातून भरण्याबाबत शासनाने अनुमती दिल्याचे न्यायाधिकरणाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. सदर पत्राची दखल घेऊन सर्व रिक्त पदे दोन आठवड्यात भरणेबाबत न्यायाधिकरणाने संचालक यांना आदेशीत केले.

उपरोक्त आदेशाचा पाठपुरावा करूनही संचालक यांनी रिक्त पदे भरणेबाबत कोणतेही पाऊल उचलले नाही. केवळ अंशकालीन कर्मचारी प्रवर्गातील रिक्त पदे भरून माजी सैनिक कोट्यातील 78 पदे तशीच रिक्त ठेवण्यात आली.

सैनिक कल्याण बोर्डाकडून ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे उमेदवारांना सांगण्यात आले. त्यावर उमेदवारांनी उच्च न्यायालयात याचिका सादर करून सैनिक कल्याण बोर्डाची अनुमतीही प्राप्त केली. तरीही संचालक यांनी 78 रिक्त पदे भरणेबाबत कसलीही हालचाल न केल्याने मूळ अर्जदार बडे यांनी प्रशासकीय न्यायाधिकारणाकडे अवमान याचिका सादर केली. त्यावर न्यायाधिकरणाने संचालक यांना नोटीस बजावून त्यांचा खुलासा मागवला. डॉ. दिलीप म्हैसेकर यांनी सादर केलेला खुलासा असामाधानकारक वाटल्याने न्यायाधिकरणाने त्यांना अवमानप्रकरणी अंतिम नोटीस काढली आहे. पुढील सुनावणी 15.09.2022 रोजी ठेवण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीन ॲड. चैतन्य धारूरकर हे काम पहात आहेत.

# माळीवाडा ग्रामपंचायतीत भारतीय स्वातंत्र्य अमृतमहोत्सवानिमित्त ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज



**माळीवाडा :** 15 ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्य अमृतमहोत्सव निमित्त ध्वजारोहण माळीवाडा ग्रामपंचायत सरपंच अनिता हेकडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी माळीवाडा ग्रामपंचायतचे उपसरपंच कडु किर्तीकर, ग्रामपंचायत सदस्य धम्मपाल गायकवाड, प्रविण बर्डे, मनेष गाजरे, कृष्णा मुळे, ज्योती मुळे, जिजाबाई भगत, मंदाकिनी किर्तीकर, कमलबाई आस्वार, ग्रामविकास अधिकारी जी.व्ही. हारदे, अंगणवाडी, आशा कार्यकर्त्या, पोलीस पाटील प्रमोद साठे, सुधाकर हेकडे, नंदकिशोर मुळे, नितीन वानखेडे, गणेश आस्वार, भगवान बनसोडे, कैलास भगत, यादव शिनगारे, सुभाष शिंदे, अमोल साठे आदींची उपस्थिती होती.

# कलवानिया, केंद्रे, जोशी, हिस्वनकर यांना राष्ट्रपती पदक

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** पोलीस अधीक्षक मनीष कलवानीया, पोलीस आयुक्तालयातील जिनसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व्यंकट केंद्रे, बिनतारी संदेश विभागातील पोलीस निरीक्षक संतोष जोशी, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा हिस्वणकर यांना राष्ट्रपती पदकाने गौरवण्यात आल्याची माहिती पोलीस महासंचालनालयाकडून कळवण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक कानवालीया २०१९ साली अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून गडचि रोली येथे कार्यरत असतांना २०२० साली नक्षलवाद विरोधी अभियान राबवले. पाच नक्षलवादी यमसदनी पाठवले, ठार झालेल्या नक्षलवाद्यांवर १८ लाखांचे बक्षीस होते.

या कारवाईची शासनाने दाखल घेत त्यांना राष्ट्रपतींचे शौर्य पदक जाहीर केले. तर पोलीस निरीक्षक व्यंकट केंद्रे यांनी गेल्या ३६ वर्षात निष्कलंक सेवा बजावली आहे. १९८७ ते १९९२ या काळात कुख्यात दहशतवादी विजयकुमार उर्फ शामराव किनाके याच्या ऑपरेशन विजयकुमार या नांदेड विभागात झालेल्या कारवाईत अत्यन्त साहस आणि उत्कृष्ट कामगिरी पार पाडल्या प्रकरणी पोलीस महासंचलनालयातर्फे ३० हजार रु. रोख व प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले आहे. हिंगोली जिल्ह्यातही त्यांनी स्त्री अत्याचार सारखे गुन्हे कुशलतेने हाताळून गुन्हे घडण्याचे प्रमाण कमी केले आहे, त्याचप्रमाणे गेल्या तीन वर्षांपासून जिन्सी पोलिस ठाण्यात कार्यरत असताना एकही अनुचित प्रकार घडला नाही. कोरोना काळात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राज्याच्या गृहमंत्र्यांनी त्यांचे कौतुक केले होते.

त्यामुळे गेल्या १ मे रोजी त्यांना पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह मिळाले आहे तर उत्कृष्ट सेवाभिलेख राखल्यामुळे त्यांना राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. तसेच १६७ रिवॉर्ड व पोलीस महासंचालक यांचे पदक मिळालेल्या पोलीस निरीक्षक संतोष जोशी यांना राष्ट्रपती पदक मिळाले तर पीएसआय कृष्णा हिस्वणकर यांनाही यापूर्वी २३१ बक्षिसे जाहीर झालेली आहेत. त्यांनाही राष्ट्रपती पदक मिळाले आहे.

# शहीदों की चिताओं पर लगेंगे हर बरस मेले, वतन पर मरने वालों का यही बाकी निशा होगा

आधुनिक केसरी न्यूज



**मलकापूर :** १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन निमित्ताने मलकापूर येथील सक्षम ग्रुप तर्फे पुलवामा येथील आतंकवादी हल्ल्यात शहीद संजयसिंग राजपूत यांच्या स्मारकावर वृक्ष लागवड करण्यात आली. त्यावेळी सक्षम ग्रुपच्या वतीने संकेत सावळे यांनी सामाजिक क्षेत्रात काम करत असलेल्या व मलकापूरच्या तरुणाईला नेहमीच मार्गदर्शन करणारे अमरकुमार तायडे, रिक्की सावळे, सिद्धांत इंगळे, गोपाल सातव यांना बोलवले असता त्यावेळी केंद्रीय मानवाधिकार नवी दिल्लीचे अमरकुमार तायडे संबोधित करताना म्हणाले की, शहीदों की चिताओं पर लगेंगे हर बरस मेले, वतन पर मरने वालों का यही बाकी निशां होगा, असे उदगार काढले. त्यानंतर रिक्की सावळे आणि सक्षम ग्रुप हर तरे ची मदत करण्याचे आश्वासन दिली. त्यावेळी वृक्ष लागवडसाठी सक्षम ग्रुपचे अनेक कार्यकर्ते हजर होते.



# जि.प.प्रा.शाळा देव्हारी येथे ७५ वा वर्धापन दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७५ वा वर्धापन दिन सोयगाव तालुक्यातील देव्हारी येथील जि.प.प्रा.शाळेच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. सदर कार्यक्रम हा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

स्वातंत्र्य दिनी covid -19 च्या काळात सोशल डिस्टनचे पालन करून राष्ट्रीय झेंड्याला सलामी देताना उपस्थित असलेले शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल हरलाल चव्हाण, ग्रामपंचायत सरपंच शामिरखा तडवी, उपसरपंच मीराबाई चव्हाण, मोहन चव्हाण, नरसिंग पवार, ग्रामसेवक सुरेश काळे आणि जि.प.प्रा. शाळेचे मुख्याध्यापक बी.एम. गायकवाड, शाळेचे शिक्षक मोरे, राजपूत, चोपडे, गावीत, राजंनकर, उत्तम चव्हाण, तेजराव जाधव, अंगणवाडी सेविका आणि मदनिस अनिता राठोड, पुष्पा चव्हाण, साधना ताई, आधुनिक केसरीचे प्रतिनिधी बहादुर चव्हाण यांच्या उपस्थितीत देव्हारी येथे भारतीय स्वातंत्र्याचा ७५ वा वर्धापन दिनी ध्वजारोहणाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

# सोयगाव जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून तालुकास्तरीय रानभाजी महोत्सव उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** येथे दि. १५ रोजी बचत भवन पंचायत समिती सोयगाव येथे आदिवासी दिनाचे औचित्य साधून तालुकास्तरीय रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना तालुका प्रमुख प्रभाकर काळे, नगराध्यक्षा श्रीमती आशाबी तडवी, उपनगराध्यक्षा श्रीमती सुरेखा काळे, जि.प.सदस्य गोपीचंद जाधव, तहसिलदार आर.बी.जसवंत, नायब तहसिलदार जी.के.सुरे, गट विकास अधिकारी पी.व्ही.नाईक, पो.स्टे.प्रभारी सोयगाव अनमोल व्ही. केदार, जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव, पो.स्टे.प्रभारी फर्दापूर दि.बी.वाघमोडे, पंचायत समिती सदस्य श्रीमती संजीवनी सोनवणे, तालुका कृषी अधिकारी सोयगाव श्रीमती एस.बी पवार, मंडळ कृषी अधिकारी बनोटी एस.जी. वाघ, मंडळ कृषी अधिकारी फर्दापूर जे.के. जाधव, कृषी पर्यवेक्षक एच.बी. देशमुख, सर्व कृषी सहाय्यक व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा ए.एस.महाजन यांची उपस्थिती होती. आजच्या रानभाजी महोत्सवाच्या निमित्ताने सर्वांना आहारातील रानभाजी समावेश करून त्यातून मिळणाऱ्या विविध खनिजे, प्रथिने, आवश्यक जीवनसत्त्वे यांची सखोल माहिती देऊन पाककृती कशी करावी याबाबत सांगण्यात आले.

आजच्या कार्यक्रमाची प्रस्तावना तालुका कृषी अधिकारी सोयगाव यांनी मांडली. संभाजी पाटील कृषि सहाय्यक बनोटी यांनी आहारातील रानभाज्यांचे महत्त्व सांगितले. तहसिलदार सोयगाव, गट विकास अधिकारी व शिवसेना तालुका प्रमुख यांनी अध्यक्षीय भाषण केले व कृषि विभागाच्या दैनंदिन जीवनातील सहभाग याबाबत माहिती दिली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन दिपक बिरारे कृषी पर्यवेक्षक यांनी केले. आजच्या कार्यक्रमाचे नियोजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक व सर्व कृषी कार्यालयातील कर्मचारी यांच्या उस्त्फुर्त सहभागाने करण्यात आले.

# पुसदच्या लोकन्यायालयात २९८ प्रकरणे निकाली; ४.६१ कोटी रुपयांची वसुली

आधुनिक केसरी न्यूज



**पुसद :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशान्वये पुसद येथे न्यायमंदिरात राष्ट्रीय लोक अदालत तालुका विधी समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश - १ राजेश अस्मर यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार पार पडले. या लोकन्यायालयात आपसातील समझोत्याद्वारे २९८ प्रकरणे निकाली निघाली असून ४.६१ कोटी रुपयांची तडजोड राशी वसूल करण्यात आली.

या राष्ट्रीय लोकअदालतमध्ये पॅनल क्रं.१ वर पॅनल न्यायाधीश म्हणून जिल्हा न्यायाधीश - २ वसंत कुळकर्णी, जिल्हा न्यायाधीश - ३ निता मखरे, पॅनल क्रं. २ वर सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर एस. एन. नाईक, पॅनल क्रं.३ वर सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर एन.जी. व्यास, पॅनल क्रं. ४ वर दुसरे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर डी.जी. मस्के, पॅनल क्रं. ५ वर तिसरे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर व्ही.एस. वाघमोडे तसेच पॅनल क्रं. ६ वर चवथे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर श्रीमती एस.जी. जाधव, पॅनल क्रमांक ७ वर पाचवे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर जी.एस. वरपे, पॅनल क्रमांक ८ वर सहावे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर व्ही.बी. चव्हाण, पॅनल क्रमांक ९ वर सातवे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर एस.झेड. कादरी, पॅनल क्रमांक १० वर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर आर.आर. मावतवाल यांनी पॅनल न्यायाधीश म्हणून कामकाज सांभाळले. तसेच जिल्हा न्यायालय - १, पुसद येथील अधीक्षक व्ही. आर. बंगाले, सामाजिक कार्यकर्ते डॉ.भालचंद्र देशमुख, राजु गायकवाड, सतिश डोंगरे, मिलींद ससाणे, मधुकर धर्मा राठोड, आवेश करणी, महेश काळे, प्रा. दुधाट, सांरगधर मधुकर अडसर व प्रा. दिनकर गुल्हाने, विधीज्ञ महेश पाठक, ॲड. रमेश जाधव, ॲड. श्वेता पांढरीपांडे, ॲड. अंबिका जाधव, ॲड. सुचिता नरवाडे, ॲड. राजेन्द्र शिंदे, ॲड. डी. एम. राठोड, ॲड. अभिमान खैरमोडे, ॲड. याशिर सैयद, ॲड. तहेसिन अहमद व इतरव सामाजीक कार्यकर्ते, न्यायालयीन कर्मचारी हजर होते. या लोकअदालतीत वादपूर्व प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, मोटार अपघात दावे, चेक बाऊन्स (१३८ एन.आय. ॲक्ट) प्रकरणे, वाहन कायदा संदर्भाचे प्रलंबित व इतर अशी ३८२१ प्रकरणे ठेवण्यात आलेली होती. त्यापैकी २९८ प्रकरणे समझोताद्वारे निकाली काढण्यात आलीत. यातून एकूण रक्कम चार कोटी ६१ लाख अकरा हजार सातशे चौपन रुपयांची रक्कम आपसी तडजोडीतुन वसुल करण्यात आली आहे. या लोकअदालतीत विधी सेवा समितीचे आर.व्ही. पेटकर, एस.जी. मदणे, डी.डी. टाले, पी.ए. कोयरे, निलेश खसाळे, पी.एम. भलगे व न्यायालयीन कर्मचारी यांनी लोक अदालतीच्या यशासाठी पुढाकार घेतला.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा : देवेंद्र भुजबळ

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** पालक व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांच्या निव्वळ टक्केवारी मागे न लागता त्यांच्या सर्वांगीण जडणघडणीकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. यासाठी शाळेचे नामवंत माजी विद्यार्थी व शाळेजवळील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सहभाग अवश्य घ्यावा, असे प्रतिपादन निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी केले. श्री छत्रपती शिक्षण मंडळाच्या नवी मुंबईतील सानपाडा येथील विवेकानंद संकुलात आयोजित अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी होते.

भुजबळ पुढे म्हणाले की, सुमारे ६२ वर्षांपूर्वी ठाणे, पालघर, रायगड

जिल्ह्यातील आदिवासींच्या आणि अन्य वंचित घटकांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकासासाठी राष्ट्रवादी विचारांनी प्रेरित होऊन सुरू केलेल्या श्री छत्रपती शिक्षण मंडळाच्या आज ५५ शाखा आणि १८ हजार विद्यार्थी संख्या आहे, ही अत्यंत गौरवाची बाब आहे. संस्थेच्या शाळांतील विविध उपक्रमांचे कौतुक करून संस्थेच्या कार्याचा अधिक विस्तार व्हावा, अशा शुभेच्छा त्यांनी व्यक्त केल्या.

डॉ नंदकुमार जोशी यांनी त्यांच्या भाषणात संस्थेच्या विविध शाळांमधून राबविल्या जाणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. तसेच स्वातंत्र्य दिनाचा खरा अर्थ विद्यार्थ्यांना सांगितला.

याप्रसंगी साप्ताहिक विवेकतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या 'अखंड भारत का आणि कसा?' व 'फाळणी च्या वेदना एक विस्मृत नरसंहार' या दोन पुस्तकांचे विमोचन प्रमुख अतिथी देवेंद्र भुजबळ व डॉ. जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. शिरीष गुजरकर यांनी साप्ताहिक विवेकतर्फे प्रकाशित पुस्तकांबद्दल माहिती सांगितली.

प्रारंभी श्री देवेंद्र भुजबळ यांच्या हस्ते भारतमाता पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले.

या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ सटेलाईट सिटी, वाशी तर्फे शाळेला दोन संगणक भेट देण्यात आले. तसेच शाळेमध्ये इंट्रेक्ट क्लब स्थापन करून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवू असे आश्वासन क्लबचे चोपडा यांनी दिले.

शेवटी उपस्थितांचे आभार मानून संपूर्ण वंदे मातरम् म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमास संस्थेचे कार्यकारी सदस्य श्री.संजय पालकर, डॉ. अरुंधती जोशी, न्यूज स्टोरी टुडेच्या सहसंपादक सौ. अलका भुजबळ, सर्वश्री आनंद देशमुख, मोहनराव ढवळीकर व इतर निमंत्रित मान्यवर, पालक प्रतिनिधी, माजी विद्यार्थी, संकुलातील सर्व विभागाचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. संजय शिरसाट यांच्या हस्ते रस्ता कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** छत्रपती संभाजीनगर पश्चिम मतदार संघाचे आमदार संजय शिरसाट यांच्या स्थानिक विकास निधीतून आणि नगरसेविका शिल्पाराणी वाडकर यांच्या प्रयत्नातून दशमेश्वर शिव मंदिर ते विश्वरूप मंगल कार्यालयपर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचा शुभारंभ आमदार संजय शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, नगरसेवक सिद्धांत शिरसाट, नगरसेविका शिल्पाराणी वाडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी विभाग प्रमुख सुधीर चौधरी, शाखा प्रमुख पंकज वाडकर, दशमेश्वर शिव मंदिर चे अध्यक्ष बालाप्रसाद तापडिया, शिवानंद वाडकर, अनिल मुळे, रामेश्वर हुरणे, सतीश ढगे, संदीप शिरसाठ, रवी पाटील, विमलेश गांधी, प्रवीण लाहोटी, सागर वाडकर, संकेत वाडकर, महेशभाई गुजराथी, विजय वासन, अशोक येवले, राजु कुलकर्णी, प्रशांत लकडे, सुनिल काथार, आशिष झंवर, रवी महाजन, विनोद कुंकुलोळ, अजय पांडे, शैलेश रायसोनी, संजय कासलीवाल, अजय वळसे, अभ्यंकर, वामन कुलकर्णी, राजेश बिहानी, अभय ओसवाल, गादिया, मारोती स्वामी, गजानन स्वामी सुभाष आगे, विठ्ठल बोर्डे तसेच शिल्पा वाडकर, गौरी झंवर, सपना जैन, स्मिता ममदापुरे आणि परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.



# अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील आठेगाव खेडा गावात आदिवासी अल्पवयीन मुलीवर गावातील सहा नराधमांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी सहाही आरोपींना ताब्यात घेतले असून यात एका विधिसंघर्ष मुलाचाही समावेश आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडितेच्या आईने दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, शनिवारी (13 ऑगस्ट) रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास पीडिता घरी असताना सहा जणांनी तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला. विशेष म्हणजे यातील काही आरोपींकडून यापूर्वी सुद्धा पिडीत मुलीची छेड काढून तिच्यावर अत्याचार करण्यात आला होता. मात्र घरीची परिस्थिती चांगली नसल्याने आणि आरोपींकडून मिळालेल्या धमकीमुळे पिडीताने याबाबत कुणालाही काहीही सांगितले नाही.

आदिवासी अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार केल्याप्रकरणी पोलिसांनी एकूण सहा जनांना अटक केली आहे.

पीडित मुलीच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्याने मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात. तर पीडिता ही शिक्षण सोडून पोटाची खळगी भरण्यासाठी आपल्या आईबरोबर मोलमजुरीचे काम करते. अनेकदा आई कामाला गेल्यावर मुलगी घरी एकटीच असायची. त्यामुळे आरोपींनी याचा फायदा घेत पिडीत मुलीची आई घरी नसताना तिच्यावर अत्याचार केला. नंतर पुढेही अनेकदा अशाप्रकारे अत्याचार करण्यात आला आहे.

# भारतीयत्व कायम ठेवणे आवश्यक : अमोल पुसदकर



लवकुशनगर मानेवाडा, नागपूर येथील ध्वजारोहण कार्यक्रमात बोलताना अमोल पुसदकर.

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** 15 ऑगस्ट 2022 रोजी लवकुशनगर मानेवाडा, नागपूर येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन लवकुश नगर नागरिक मंडळातर्फे करण्यात आलेले होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध फक्त अमोल पुसदकर उपस्थित होते. आपल्या प्रमुख भाषणात ते म्हणाले की स्वातंत्र्यांमध्ये स्व आणि तंत्र हे दोन शब्द आहेत. क्रांतिकारकांना स्वतःच्या तंत्राने चालणारा देश पाहिजे होता म्हणून त्यांनी इंग्रजांना या देशातून हाकलून लावले. परंतु आज स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतर सुद्धा आमची भाषा, आमची भूषा, आमची भोजन पद्धती, आमचे औषध या सर्वांवरच विदेशी संस्कृतीचा प्रभाव झालेला आहे. येणाऱ्या काळात आमच्या जीवनपद्धतीमध्ये आमचा स्व कायम राहणे आवश्यक आहे. तो कायम राखण्याचा संकल्प नागरिकांनी करावा. असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी गजानन शेळके विशेष उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेश उपासे यांनी केले. कार्यक्रमाला विजयराव दासलवार, दत्तात्रयजी बोकडे, विजय राठोड, विजयराव कोम्बे, विजयराव बिडकर, प्रशांत पराड, सौ. पराड व अनेक गणमान्य लोक उपस्थित होते.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## एसटीडी/एच.आय.व्ही...

आधुनिक केसरी

**निदान व उपचार**

जेनायटल वॉर्टसचे निदान करण्यासाठी पॅप स्मिअर नावाची टेस्ट केली जाते. उपचारांमध्ये एकतर शरीर स्वतःच याला एक ते दोन महिन्यांमध्ये दुरुस्त करते. तसेच क्रीम, जेल, लिक्विड नायट्रोजन, ट्राय किंवा बायक्लोरो अॅसेटिक अॉसड्ने जाळणे, क्वाटरी किंवा रेडिओ फ्रिक्वेन्सीने जाळणे, कट करणे असे उपचार उपलब्ध आहेत. पॅप स्मिअर इन फिमेल्स यामुळे कॅन्सरचे निदान होते. कॉलपोस्कोपी करणे हा देखील यावरील एक उपचार आहे. ज्यामध्ये योनी व गर्भाशयाची जागा मोठ्या आकराची दिसते आणि त्यामुळे कॅन्सरपेशी दिसू शकतात. सहसा याला कुठलीही टेस्ट नसते. याचा पूर्ण नायनाटही करता येत नाही. काळानुसार आपले शरीर त्याला संपवते.

**प्रतिबंध :** या काळात सेक्स न करणे, कमी सेक्स पार्टनर ठेवणे किंवा न ठेवणे (ज्यामुळे याचा प्रसार होतो), लस टोचून घेणे, HPV VACCINE कंडोम, डेटंल डॅम्स (मुख मैथुनासाठी) वापरणे असे विविध प्रतिबंधात्मक उपाय सांगता येतात.

**खरुज (स्कॅबीज) :** हे परजीवी (पॅरासाईट्स) त्वचेला इन्फेक्शन करुन भयंकर खाज आणतात. याचा संसर्ग हा त्वचेचा त्वचेला संपर्क झाल्याने होतो. तसेच सेक्स केल्याने तथा इफेक्टेड स्कीनशी संपर्क आल्यानेही याचा संसर्ग होतो.

**लक्षणे :** यामध्ये असह्य खाज सुटणे व पुरळ येणे, रात्री जास्त खाज येणे, लिंग, नितंब, मनगट, स्तनाग्न, कंबर, खांदे, काख, कोपरा आणि बोटांच्या मध्ये रेश येणे. त्याचप्रमाणे त्वचेखाली छोटी छोटी छिद्रे दिसणे (कारण मादी माईट्स या त्वचेखाली घुसतात). जर एखाद्याला खरुज (स्कॅबीज) पहिल्यांदाच आली असेल तर तिची लक्षणं दिसायला २ ते ६ आठवडे लागतात. जर अगोदर होऊन गेलेली असेल तर २४ तासांत लक्षणे दिसतात आणि सर्वात मुख्य म्हणजे लक्षणं नसताना देखील खरुज पसरते.

**निदान आणि उचार :**

त्वचेच्या (स्कीन) तुकड्याची तपासणी करुन याचे निदान केले जाते.

(क्रमशः)

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी अॅण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# अश्वमेध क्रीडा मंडळ गोपाल काला उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अनिल मकरिये

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अश्वमेघ क्रीडा मंडळ गोपाल काला उत्सव समितीच्या अध्यक्षपदी अनिल मकरिये यांची एकमताने निवड करण्यात आली. औरंगपुरा येथे घेण्यात आलेल्या मंडळाच्या बैठकीत एकमताने निवडण्यात आलेली कार्यकारणी पुढीलप्रमाणे.



उपाध्यक्ष -विशाल पांडे, सचिव -अॅड. राजेंद्र बनकर, कार्याध्यक्ष -चेतन जांगडे, कोषाध्यक्ष -मिथुन गोश्के, विनोद सोनवणे, जगदीश चोरगे, पंकज तांबोळी, सहसचिव -कचरु घोडके, दिपक साळवे, दिपक मुंडले, राजु स्नेही, सिध्दार्थ साळवे, स्वागताध्यक्ष -अॅड. सचिन सुदामे, प्रा. सुनील जाधव, प्रविन नागोरी, दिपक मोरे, रविंद्र जाधव, किशोर देशमुख, राहुल कुलकर्णी, सदस्यगोपाल कुर्ले, अमृत चोरगे, तुषार भुवनकर, नागेश थोरात, अशोक पवार, सचिन भगत, श्रीधर बक्षी, संतोष श्रावगे, दिनेश बसैये, अजय परदेशी, दिपक चव्हान, आदेश जाधव, मनोज शेरकर, पिन्टया लसगरे, नितेश पुच्छे, शुभम दहिवाल, सचिन गांगण, संदीप मिसाळ, गणेश वाघमारे, रोहित बनकर, सचिन अग्रवाल, प्रविण देशमुख, ललीत चव्हाण, यागेश हिवाळे, कैलास मगर, आकाश हर्सूलकर अवधुत जाधव, संतोष मगर, संतोष बाळेकर, प्रथमेश मोरे, अमोल घेवारे, सल्लागार -खा. भागवत कराड (केंद्रिय अर्थ मंत्री), आ. अतुल सावे (कॅबीनेट मंत्री म.रा.), शिरीष बोराळकर, संजय केनेकर, रविंद्र पांडे आदी.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in